



गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ | अंक : ४३ | सोमवार दि. २८ ऑक्टोंबर २०२४ ते रविवार दि. ०३ नोव्हेंबर २०२४ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||

## आयाराम-गयारामांना झालीय आमदार होण्याची घाई भाजपा इतरांना आपसात लढवून फायदा आपला पाही



मुंबई/वरिष्ठ प्रतिनिधी

**महाराष्ट्रात सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. पण या रणधुमाळीत आयाराम गयारामानी जो धुडगूस घातला आहे त्याने मतदारांमध्ये संतापाची भावना आहे. कारण राजकीय पक्षांच्या जागा वाटपातील साठमारी आणि निवडणुकीच्या तिकिटासाठी या पक्षातून त्या पक्षात उड्या मारणाऱ्यांची लाचारी पाहून अशा दलबदलू आणि मतदारांशी गद्दारी करणाऱ्या पुढाऱ्यांना का निवडून द्यायचे असा लोक सवाल करीत आहेत. अडीज वर्षापूर्वी शिवसेना आणि राष्ट्रवादीत फूट पडली. त्यानंतर अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी भाजपच्या साथीने महायुतीचे सरकार स्थापन केले. पण त्यांची ही महायुती खरोखरच एकसंघ आहे का? असा प्रश्न पडतो. कारण महायुतीच्या जागावाटपात भाजपने शिंदे आणि अजित पवार या दोन्ही मित्र पक्षांच्या तोंडाला पाने पुसली. त्यामुळे अजित पवार गटाच्या अनेक आजी-माजी आमदारांनी शरद पवारांच्या पक्षात प्रवेश केला. भाजपात शांत झोप लागते असे म्हणत मोठ्या आशेने भाजपात गेलेल्या हर्षवर्धन पाटलांची भाजपने झोप उडवल्यामुळे त्यांनाही शरद पवारांची तुतारी हाती घ्यावी लागली. भाजपने राजकारणाची अशीकाही खिचडी करून टाकली की नाती गोती सुद्धा शिल्लक राहिली नाही. दिंडोरीत बापा विरुद्ध मुलाने दंड थोपटले होते. तर अहेरीत अजित दादांच्या राष्ट्रवादीचे नेते मंत्री धर्मराव बाबा अत्राम यांच्या विरुद्ध त्यांची मुलगी भाग्यश्री मैदानात आहे. रक्ताच्या नात्यातही जर दाणे टाकून कोंबड्या झुंजवल्या जात असतील आणि कुटुंब फोडली जात असतील तर अशा लोकांना मतदारांनी निवडून द्यायचे का?**

ज्यांना रक्ताची नाती कळली नाही त्यांना जनतेची जबाबदारी काय कळणार बरे? तिकिटासाठी राजकारणी मतदारांशी तर गद्दारी करतातच पण पक्षाशी सुद्धा बेईमानी केली जाते. भाजपात सरचिटणीस असलेल्या निलेश राणेंनी तिकिटासाठी शिंदेंचे धनुष्यबाण हाती घेतले. तर अजीत दादांनी तिकीट नाकारताच समीर भुजबळ यांनी शरद पवारांच्या बंगल्याची पायधूळ झाडली. उमेदवारी अर्ज दाखल करायची अंतिम तारीख जवळ आली तरी महायुती जागावाटपाचा वाद मिटलेला नाही तो बहुतेक निवडणुकीच्या निकालानंतरच मिटेल. महायुतीच्या तिकीट वाटपात भाजपने शिंदे आणि अजितदादांना अंगठा दाखवून जास्तीत जास्त जागा आपल्या पदरात पडून घेतल्या. हे सर्व किळसवाणे प्रकार पाहिल्यानंतरही मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करावे असे निवडणूक आयोगाला का वाटते याचे उत्तर त्यांनी द्यायला हवे.

महाराष्ट्रात २० तारखेला मतदान आणि २३ तारखेला मतमोजणी आहे. जवळपास साडेआठ कोटी मतदार या निवडणुकीत मतदान करणार आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपावरून घोळ सुरु असल्याने प्रत्येकांनी कोणाच्या वाट्याला किती जागा आल्या याच्या आकडेवारीची वाट न पाहता आपापल्या याद्या जाहीर केल्या. याचाच अर्थ महायुती आणि महाविकास आघाडीतील पक्षांचा आपापल्या आघाडीतील पक्षांवर विश्वास नाही. महाराष्ट्रात प्रथमच तिरंगी चौरंगी लढती होणार आहेत. मविआ आणि महायुतीच्या विरोधात संभाजी राजांची तिसरी आघाडी आहे शिवाय मनसे आहे, यात कोणकोणाच्या बाजूने आहे तेच कळत नाही. या निवडणुकीत जरांगे यांचा मात्र पोपट झाला. इतका मोठा मराठा समाज त्यांच्या सोबत असतानाही त्यांना लोकसभेची निवडणूकही लढवणे जमले नाही आणि विधानसभेलाही काही जमेल असे वाटत नाही. निवडणूका लढवण्यासाठी केवळ सोबत माणसांची गर्दी असणे महत्वाचे नाही तर त्या गर्दीचा प्रभाव असावा लागतो. त्या गर्दीच संघटनात्मक ताकतीत, ...पान २ वर

## उद्योजकाच्या पत्नीला दुसऱ्याचा लागला लळा प्रियकराच्या मदतीने पतीचाच आवळला गळा





मयत संतोष

बेळगावी/क्राईम रिपोर्टर

**आजकाल लोकांना मोबाईलचे वेद लागलेले आहे. रिकाम्या माणसांसाठी तर मोबाईल हे वेळ घालवण्याचे साधन बनले आहे. सोशल मिडियावरील फेसबुक, इंन्टाग्राम, व्हॉट्सॲप यावरून नवे नवे मित्र जोडायचे आणि त्यांच्याशी चॅटिंग करायची हाच काही लोकांचा दिनक्रम बनलाय. बेळगावी येथे राहणारी उमा ही एका उद्योगपतीची पत्नी पण तिलाही चॅटिंगचे व्यसन जडले होते, त्यातून तिचे एका तरुणाशी संबंध जुळले आणि त्यांचे अनैतिक नाते सुरु झाले. मात्र पतीला याचा सुगावा लागताच घरात भांडणे होऊ लागली. अखेर प्रियकराच्या मदतीने तिने पतीचा काटा काढला आणि पती हृदयविकाराच्या झटक्याने मेल्याचा बनाव केला, पण तिच्या मुलीनेच आईचा बनाव हाणून पाडला. त्यानंतर पोलिसांनी आरोपींना अटक केली.**



संतोष दुंडाप्पा पद्मान्नावर हे पत्नी उमा आणि दोन मुलासह महातेंशनगर येथे रहायला आहेत. ते मोठे उदयोजक असल्याने त्याच्या घरी कामगारांचा राबता ही होता. बेळगावी शहरातील आणि आजुबाजुच्या परिसरातील ते नामवंत उदयोजक म्हणून ओळखले जात होते. त्याची एक १९ वर्षीय मुलगी संजना ही बंगळूरू येथे अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आहे तर दोन्ही मुले ही बेळगावी येथे शिक्षण घेत आहेत. पतीचा मोठा बिझनेस असल्याने आणि घरात नोकर चाकर असल्याने उमा यांचा वेळ तसा रिकामाच जात होता. या रिकाम्या वेळेत त्या आपल्या मोबाईलवरून फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हॉट्सॲप चालवित होत्या. त्याचा सगळा वेळ हा मोबाईलमध्येच जात होता. त्यातच संतोष याचे सगळे लक्ष आपल्या बिझनेसकडे असल्याने त्यांना आपल्या पत्नीकडे लक्ष ...पान २ वर

## अंगणवाडीसेविकेला एकांतात गाठले बलात्कार व हत्या करून नदीत टाकले



अहिल्यानगर/क्राईम रिपोर्टर

**सध्या महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढल्या आहेत. गडचिरोलीत अशीच एक संतापजनक घटना घडली आहे. अंगणवाडीत एकटी राहणाऱ्या एका अंगणवाडी सेविकेवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली. या प्रकरणी आरोपी तरुणाला पोलिसांनी अटक केली आहे. अहिल्यानगर तालुक्यातील चिंचोडी पाटील शिवारातील संतापाची लाट उसळली आहे.**

अहिल्यानगर तालुक्यातील चिंचोडी पाटील शिवारातील मारुती वाडी येथील अंगणवाडीच्या इमारतीतच सेविकेचा खून झाल्याचे शुक्रवारी सकाळी उघड झाले. याप्रकरणी एका आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. उमा महेश पवार (वय ३२ रा. चिंचोली पाटील ता. नगर) या गावातीलच ...पान २ वर

## वर्चस्वाच्या वादातून दुष्मनी झाली कृष्णा मुद्देने शिवाजीची हत्या केली

लातूर/प्रदिप राठोड

**आजकाल माणूस इतका चिडखोर बनला आहे कि त्याला शुल्लक गोष्टीवरूनही राग येतो. एकत्र काम करणाऱ्या लोकांमध्येही कधी कधी वाद होऊन मैत्रीचे रुपांतर दुष्मनीत होते. वाहन तळावर एकत्र गाडी लावून व्यवसाय करणाऱ्या दोन नातेवाईकांमध्ये चांगले संबंध आणि मित्रत्वाचे नाते होते. पण नंतर मात्र दोघांमध्ये वर्चस्वाची लढाई सुरु झाली. त्यातूनच एका महिलेच्या भाड्यावरून त्यांच्यात वाद झाला आणि याच वादातून शिवाजी देवकर कृष्ण याची कृष्ण मुद्देने हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**



१७ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास शिवाजी चौकापासून थोड्याच अंतरावर असलेल्या दयानंद गेट परिसरात एका तरुणावर कत्ती हल्ला झाला असून तो रक्ताच्या थारोळ्यात पडला असल्याची वार्ता शहरात वाऱ्यासारखी पसरली. जवळच महाविद्यालय असल्याने बहुतेक विद्यार्थ्यांमध्ये हाणामारी झाली असावी आणि त्यातून हा प्रकार घडला की काय अशी भीती नागरिकांतून व्यक्त केली जात होती. दरम्यान सकाळचे सत्र असल्यामुळे कामाच्या शोधात शिवाजी चौक ...पान २ वर

## पोलीस मागे लावल्याचा संशय आला तीन गुंडांनी कार्यकर्त्याचा खून केला



मुंबई/एस. कुमार

**खरे तर राजकीय पक्षांच्या नेत्यांना गुंड पाळावे लागतात आणि आजकाल राजकारणाचे मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारीकरण झालेले असल्याने राजकीय नेते आणि गुंड यांचे साटेलोटे असतात. पण काही राजकीय कार्यकर्त्यांना आपला विभाग गुन्हेगारीमुक्त असावा असे वाटते. अशावेळी ते विभागातील गुन्हेगारांच्या विरोधात मोहीम उघडतात आणि त्यांची पोलिसांकडे तक्रार करतात. मुंबईत अशाच एका घटनेत राष्ट्रवादीचे कार्यकर्ते असलेल्या सचिन कुर्मीमुले पोलीस आपल्याला त्रास देतात त्यांच्यामुळे आपल्यावर गुन्हे दाखल झालेत असा संशय काही गुंडांना होता याच संशयातून यांची तीन दाखलेबाज गुंडांनी कुर्मिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

प्रत्येक राजकीय पक्षाच्या पाठीमागे कट्टर पाठीराखे असतात. त्यांमधील काही कार्यकर्ते म्हणजे प्रत्यक्ष काम ...पान २ वर

## मोबाईल चोरीच्या संशयातून ठार केले तीन तासात सर्व आरोपी गजाआड झाले



भिवंडी/क्राईम रिपोर्टर

**सध्या मोबाईलचे महत्व वाढले आहे. उद्योगपतींपासून कचरा गोळा करणाऱ्या सामान्य माणसापर्यंत सर्वांकडे मोबाईल असतो. अशावेळी मोबाईल हरवला किंवा चोरीला गेला तर माणूस अस्वस्थ होतो. भिवंडीत मोबाईल चोरीच्या संशयावरून ७ जननी एका तरुणाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.**

भिवंडी शहरात मोबाईल चोरीचा संशयावरून एका युवकाची निर्घृणपणे हत्या केल्यानंतर या घटनेची माहिती मिळताच शांतीनगर पोलिसांनी अवघ्या तीन तासात हत्या झालेल्या युवकाची ओळख पटवून सात आरोपींना बेड्या ठोकण्यात यश मिळवले आहे अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. शहरातील गोविंद नगर राहुल हॉटेल च्या पाठीमागे असलेल्या पाईपलाईन नजीकच्या रस्त्याजवळ एक अनोळखी व्यक्तीची कोणीतरी अज्ञात कारणावरून हत्या केल्याची घटना रात्री साडेआठ वाजता ...पान ६ वर

## पैशासाठी नाते संपवून टाकले पत्नीला पतीने विहिरीत फेकले

नाशिक/क्राईम रिपोर्टर



**राज्यात हुंडा प्रतिबंधक कायदा असतानाही विवाहितांचे हुंड्यासाठी बळी घेतले जातात. नाशिक जिल्ह्यातील खिर्मानी गावात शेतीसाठी माहेराहून पैसे आणण्यासाठी पती देविदास हा पत्नी योगीताचा छळ करायचा त्याला नवीन शेती घेण्यासाठी पैसे हवे होते. योगीताने एक वेळ माहेराहून ५ लाख आणून दिले तरी देविदासचे समाधान झाले नाही. सासरच्या लोकांकडून तिचा छळ सुरूच होता आणि एके दिवशी योगिताला पतीने तिच्या भावास्मोरच विहिरीत ढकलून तिचा जीव घेतला. या प्रकरणी पोलिसांनी योगीताच्या पतीसह सासरच्या लोकांवर गुन्हा दाखल केला आहे.**

पत्नी ही सुख-दुःखाची सोबती असते. संसार सुरू झाला की पती-पत्नी यांनी खांद्याला खांदा लावून संसाराचा गाडा ओढायचा असतो, पण काही नीच लोक मात्र पत्नीच्या माहेरच्या लोकांनी पैसा द्यावा अशी इच्छा बाळगून असतात, त्यासाठी ते पत्नीला त्रास देतात. लग्नात हुंडा घेण्याची प्रथा मोडीत निघत असली तरी संसार सुरू झाल्यानंतर अडचणीसाठी म्हणून सासरवाडीतून पैसे घेऊन बुडवणारे काही नीच लोक आजही समाजात आहेत. ...पान ६ वर

## मंदिरातील बैठकीत रक्ताचा सडा पडला आजोबांसमोरच नातवाचा मुडदा पाडला

जत/क्राईम रिपोर्टर



**सार्वजनिक क्षेत्रातील सामाजिक संघटनांचे हिशोब चोख असावे लागतात अन्यथा संघटनेत फूट पडते हिशोबावरून राडेबाजी होते आणि त्यात एखाद्याचा जीव जातो जत तालुक्यातील उमराणी गावात असेच घडले. जत्रेच्या हिशोबाची मंदिरात मिटिंग लावली होती, त्यात हिशोबावरून अध्यक्ष-उपाध्यक्ष यांच्या विरोधात पूर्वीच्या कामेतीतील सदाशिव यांनी आक्षेप घेतला त्यातून वाद सुरु झाला. या वादात सदाशिव यांनी अध्यक्षांना शिवीगाळ करताच ते त्यांना मारायला उठले. यावेळी सदाशिव यांचा नातूमध्ये पडला, पण संतापलेल्या अध्यक्ष उपाध्यक्षांनी नात्वावारच हल्ला केला आणि त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

उमराणी येथे कैकाडी समाज हा मोठया प्रमाणात आहे. या समाजाच्या वतीने गावात दरवर्षी गावदेवीचा उत्सव मोठया प्रमाणात साजरा केला जातो. या उत्सवाला समाजातील लोकाबरोबरच इतर समाजातील लोक ही येत असल्याने मोठया प्रमाणात देवीची यात्रा भरवली जाते. या यात्रेला गावातील लेकी सुनांना पै-पाहुण्यांना बोलावून त्याचे आदरतिथ्या केले जाते. गेल्या अनेक वर्षापासून या देवीची यात्रा कैकाडी समाजातील ज्येष्ट सदाशिव मारूती बजंत्री याच्या मार्गदर्शनाखाली भरवली जात होती. परंतु अलिकडे समाजात दोन गट पडल्याने देवीच्या यात्रेची जबाबदारी ही गेल्या दोन तीन वर्षापासून विशाल कैकाडी आणि रविंद्र कैकाडी यांचेकडे आली. या दोघांना समाजातील इतर लोकांचा ही पाठिंबा मिळत असल्याने त्यांनी ही देवीच्या यात्रेची परंपरा जोमात चालविली होती. परंतु गाव ते गाव राहट गाडा असतो एकाने केले ...पान ६ वर

28 OCTOBER TO 03 NOVEMBER 2024 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 10/26/2024 10:25 PM Page 1



पान १ वरून...

## आयाराम-गयारामांना झालीय आमदार...

रुपांतर करावं लागतं. तरच निवडणुकीत त्या गर्दीचा उपयोग होतो. केवळ गर्दीच्या जीवावर निवडणुका जिंकता आल्या असत्या तर राज ठाकरे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले असते. जरांगे यांचे जसे आंदोलन फसले तसेच त्यांच्या निवडणूक लढवण्याच्या वल्गना आणि याला पाडीन त्याला पाडीन अशा फुशारक्याही फसल्या आहेत. या निवडणुकीत आणखी एका गोष्टीचे वाईट वाटते कि नेते मंडळींनी आपल्या मुलांना, सुनांना, जावयांना तिकिटे वाटली. त्यासाठी पक्षाच्या प्रोटोकॉलची वाट पहिली नाही. त्यामुळे एकाच घरात दोन दोन पक्ष बघायला मिळत आहेत आणि ज्यांनी पक्षासाठी खस्ता खाल्ल्या ते सामान्य कार्यकर्ते सतरंज्या उचलण्याचे काम करीत आहेत. अर्थात अशा अंधभक्तांची तीच लायकी होती. माझा नेता, माझा पक्ष, माझी निष्ठा हि सगळी अंधभक्ती नेत्यांच्या पोरा बाळांना तिकिटे मिळाल्याने आणि अंधभक्तांवर सतरंज्या उचलण्याची पाळी आल्याने त्यांची आकांक्षा इच्छा फोल ठरली. भाजपने मात्र पद्धतशीरपणे दाने टाकून सर्वांना झुंजवले. त्यामुळेच यंदाच्या निवडणुकीत २७ मतदार संघांमध्ये शिवसेना विरुद्ध शिवसेना तर काही ठिकाणी राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी असा सामना होणार आहे. यात भाजपचे १०० टक्के कल्याण होणार तर भाजपा सोबत गेल्याची शिक्षा म्हणून २०२९ पर्यंत शिंदे आणि अजित पवारांच्या पक्षाचे नामोनिशान मिटणार आहे. त्यामुळे आपल्या पक्षाशी गद्दारी केलेल्यांसाठी विधानसभेची हि निवडणूक कदाचित शेवटची असेल!

## उद्योजकाच्या पत्नीला दुसऱ्याचा ...

दयायला ही वेळ नव्हता. इथेच खरे तर त्याची चुक झाली होती. उमा या आपल्या मोबाईलवरून कोणाला तरी दररोज चॅटिंग करीत होत्या. शोभराज एस.एन. उर्फ शोबीत गौडा असे त्याचे नाव तो मुळचा कोडगू जिल्यातील बिदनुर येथील होता. शोभीतगौडा याच्याशी फेसबुकवरून चॅटिंग करताना उमा या त्याच्या प्रेमात कधी पडल्या हे त्याचे त्यांना कळाले नाही. शोभीत गौडा हा कामानिमत्य बंगळुरूला असल्याचे तिला समजल्यावर ती नेहमी घरातून बंगळुरूला मुलगी संजनाला भेटायला जाते म्हणून त्याला भेटून येत होती.त्या दोघांचे विवाहबाहय संबध वाढीस लागले होते. आपली पत्नी उमा ही बाहेरख्याली वागत असून ती कोणाच्या तरी प्रेमात पडली आहे याची जराही कल्पना संतोष पद्मान्नावर यांना नव्हती. विवाहबाहय संबंध हे जोपर्यंत झाकलेले असतात तोपर्यंत ते ठिक असतात. परंतु हे संबंध ज्यावेळी उघड होतात त्यावेळी मात्र होत्याचे नव्हते होऊन बसते. उमा यांनी वयाची ४५ शी ओलांडली होती. मुले ही मोठी होती नवऱ्याचा मोठा बिझनेस होता. तरी ही या वयात उमा याचा पाय घसरला. त्या विवाहबाहय संबंधात शोबीतगौडात अडकत चालल्या होत्या. बंगळुरूला मुलगीकडे जातो म्हणून त्या शोबीतगौडाला भेटून त्याच्याबरोबर मजा मारत होत्या. त्यातच आपल्या आईचे बाहेर कुठे तरी प्रेमसंबंध चालू असल्याची माहिती मुलगी संजनाला मिळाली होती. तिने आपल्या आईवर बारीक लक्ष ठेवले होते. त्यातच ती बेळगावीहून आपल्याला भेटायला येते असे सांगून ती प्रियकराला भेटायला येते हे समजल्यावर तिने आई उमा हिचा मोबाईल चेक केला असता ती फेसबुक फ्रेंड शोबीतगौडाशी तिचे प्रेमसंबंध चालू असल्याची तिची खात्री झाली. इकडे संतोष पद्मान्नवर यांनी मुलगी संजना हिला तुझी आई बंगळुरू येथे तुला भेटायला आली आहे ती परत बेळगावी येथे आली नाही असे विचारताच तिने आपल्या वडिलांना आई उमा ही आपल्या येथून दोन दिवसापूर्वीच गेली असल्याचे सांगितले. त्यावेळी संतोष याच्या मनात तिच्या विषयी शंका निर्माण झाली. तोपर्यत उमा हिने या अगोदर ही शोबीतगौडाला आपल्या घरी बोलावून त्याची ओळख ही आपल्या पतीला दुरचा नातेवाईक असल्याची करून दिली होती. परंतु त्याच्याशीच आपल्या पत्नीचे संबंध आहेत ही गोष्ट त्यांना माहित नव्हती. अलिकडे ते तिच्यावर लक्ष ठेवून होते. घरातील नोकरांना ही त्यांनी तिच्यावर गुप्तपणे लक्ष ठेवायला सांगितले होते. तरी ही उमा या त्याच्याशी फोनवरून बोलत होत्या. त्याच्याशी चॅटिंग करीत होत्या. त्या दोघांचे शारीरिक संबंध आल्याचे ज्यावेळी संतोष यांना समजले त्यावेळी त्यांनी याचा जाब पत्नी उमा हिला विचारला. त्यावेळेपासून नवरा बायकोत या कारणातून भांडणे आणि वाद विवाद होऊ लागला होता. त्यातच शोबीतगौडा याचे संतोष हे घरी नसताना उमाकडे येणे जाणे चालू होती. घरी कोण येतो काय करतो हे घरातील सीसीटीव्ही फुटेजवरून दिसत होते.आपण घरी नसताना पत्नीचा प्रियकर घरी येतो हे संतोष याच्या नजरेतून सुटले नाही. त्यांनी तिला मुले मोठी झाली आहेत त्यांना सगळे समजते तु त्याचा नाद सोड भरल्या घरात अशी वागू नकोस अशी समज दिली. परंतु त्याचे सांगणे हे तिच्यासाठी पालथ्या घड्यावरचे पाणीच होते.ती शोबीतगौडाच्या प्रेमात इतकी आकंठ बुडाली होती की, तिला मुले नवरा संपत्ती याची काहीच किमंत राहिली नव्हती. इकडे तिने प्रियकर शोबीतगौडाला सांगितले की, त्याने जर आपल्या मार्गातून नवरा संतोष याला बाजुला केले तर ती त्याची कायमची होईल शिवाय आपल्या प्रॉप्रटीतील हिस्सा ही त्याला देईल. तिने त्याला असे सांगितल्यावर तो ही संतोष याची गेम करायचा याचा तो विचार करू लागला.कारण त्याला ती पाहिजे होती. तिच्यासाठी त्याची काही ही करायची तयारी होती. म्हणून त्याने तिच्या संमतीने संतोष याची गेम करण्याचा प्लॅन केला. संतोष यांना असे मारायचे की त्याची शंका कोणाला येवू नये असे त्याने ठरविले त्यासाठी त्याने आपला मित्र बिदनुर येथील पवन रामनकट्टी याची मदत घेण्याचे ठरविले. तसे त्याने उमाला देखील सांगितले. त्या तिघांनी ही संतोष यांना मारण्याचा प्लॅन केला. घरी दोन मुले, नोकर प्रकाश कुरिया आणि नंदा कुरिया असे राहत असल्याचे तिने शोबीतगौडला सांगितले. घटनेच्या रात्री म्हणजे ९ ऑक्टोंबर रोजी रात्री तिने अभ्यासाच्या निमित्याने आपल्या दोन्ही मुलांना दुसऱ्या खोलीत झोपण्यास सांगितले. तर नोकर प्रकाश कुरिया आणि नंदा कुरिया यांना ही गेस्ट हाऊसकडे पाठवून दिले. रात्री संतोष हे झोपण्यापूर्वी दुध पिऊन झोपतात हे तिला माहित होते. तिने त्यावेळी त्याच्या दूधात नशेच्या गोळ्या मिसळल्या. त्यानंतर तिने प्रियकर शोबीतगौडा आणि त्याचा मित्र रामनकट्टी यांना फोन करून घरी बोलावून घेतले. ते घरी आल्यानंतर त्या दोघांना तिने संतोष याच्या रुममध्ये नेले. संतोष यांना गाढ झोप लागली होती. याच संधीचा फायदा घेत तिने त्याचे हातपाय धरले तर शोबीतगौडा आणि त्याच्या मित्र रामनकट्टी यांनी संतोष त्याचा गळा आवळयला परंतु संतोष हे हालचाल करू लागल्याने त्यांनी लगेच त्याच्या तोंडावर उशी दाबून धरली. त्यात त्याचा श्वास गुदमरून गेला.त्याची हालचाल मंदावल्यावर त्यांनी त्याच्या तोंडावरून उशी काढली. त्याचा त्यात मृत्यू झाला होता. या घटनेनंतर शोबीतगौडा आणि रामनकट्टी हे दोघेजण आपल्या कारने निघून गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी उमा हिने आपल्या पतीला झोपेत हृदयविकाराचा झटका आल्याचे सगळया नातेवाईकांना सांगून घरी बोलावून घेतले. त्या खरेच सांगत असतील हे ग्रहित धरून अनेकांनी उमा याच्यावर विश्वास ठेवला. तोपर्यत उमा यांनी आपल्या घरातील सीसीटीव्हीचे फुटेज आपल्या दोन्ही मुलांना सांगून डिलेट केले. दोन्ही मुले ही १३ व १५ वर्षाची असल्याने त्यांनी आपल्या आईच्या सांगण्यावरून सीसीटीव्ही फुटेज डिलेट केले. इकडे पै-पाहुणे नातेवाईक आल्यानंतर सदाशिवनगर येथील लिंगायत स्मशानभुमीत त्याचा अंत्यविधी ही उरकरून घेतला. दुसऱ्या दिवशी संध्याकाळच्या सुमारास बंगळुरूहून संजना घरी आली. तिने ही सुरूवातीला आपल्या आईवर विश्वास ठेवला. परंतु तिला आपल्या आईचे बाहेरख्याली संबंध माहित असल्याने तिच्या मनात शंकेची पाल चुकचुकीत होती. कारण आपल्या वडिलांना हार्टचा कधीच त्रास नव्हता. मग त्याचा मृत्यू हार्ट अॅटकेने झालाच कसा ही शंका तिला येत होती. तिसऱ्या दिवशी माती सावडणेचा कार्यक्रम झाल्यावर सकाळी ती आंघोळ करून घरातील सीसीटीव्ही तरी पाहू असा विचार करून ती फुटेज तपासत होती. परंतु घटनेच्यावेळचे कोणतेच फुटेज दिसत नव्हते. तिने ही गोष्ट आपल्या दोन्ही भावांना विचारले तर त्यांनी आईच्या सांगण्यावरून फुटेज डिलेट केल्याचे तिला सांगितले. तिने याबाबत आपल्या आईला विचारले तर तिने ही तिला गप्प राह असे सांगितले. विशेष म्हणजे तिसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाला स्मशानभुमीत आणि घरी शोबीतगौडा हा आला होता. संजनाच्या मनातील शंका काही जाईना म्हणून तिने बाजूच्या घरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले तर घटनेच्या दिवशी घरात आई शिवाय अन्य दोघे जण आत बाहेर करीत असल्याचे तिला दिसले. यात पाच ते सहा दिवस गेले. त्यानंतर मात्र ती गप्प राहिली नाही. तिने आपल्या एका नातेवाईकांच्या मदतीने माळ मारूती पोलीस स्टेशन गाठून आपली शंका व्यक्त करून आपले वडिल आपले वडिल संतोष दुंडाप्पा पद्मान्नावर याचा मृत्यु हा नैसर्गिक नसून त्याचा घातपात झाल्याचा संशय व्यक्त केला. संजना पद्मान्नावर हिच्या तक्रारीवरून पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्यांनी उमा याच्याकडे चौकशी करीत असताना त्यांना तिच्या बोलण्यात विसंगती आढळून येत होती. संजना यांच्या तक्रारीवरून पोलीसांनी लिंगायत दफन भूमीत पुरलेला मृतदेह बाहेर काढायचे ठरविले. पोलीसांनी वरिष्टांच्या मार्गदर्शनाखाली तलाटी, तहसिलदार आणि पंचासमोर दफन केलेला मृतदेह जेसीबीच्या सह्याने उकरून बाहेर काढला. मृतदेह कुजत चालला असल्याने प्लॅस्टिकमध्ये गुंडाळून तो उतरीय तपासणीसाठी बेळगावी येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. उतरीय तपासणीत मृत्यूचे कारण हे गळा आवळल्याने श्वास गुदमरून झाला असे नमूद होते. आता पोलीसांची शंका ही खरी ठरली होती. त्यांनी चौकशीसाठी उमा यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी करीत असताना त्याचा सयंमाचा बांध फुटला.त्यांनी रडत रडत पोलीसांनी सांगितले की, त्याचे पती संतोष हे तिच्या प्रेमात अडसर ठरत असल्याने त्यांना मार्गातून बाजुला करण्यासाठी तिने प्रियकर शोबीतगौडा आणि त्याचा मित्र रामनकट्टी असे तिघांनी मिळून संतोष याच्या तोंडावर उशी ठेवून त्याचा खून केला.तिने आपला गुन्हा कबुल केल्यानंतर या घटनेतील शोबीतगौडा आणि रामनकट्टी याचा शोध घ्यायला सुरूवात केली. खूनाचा गुन्हा दाखल झाल्याचे समजल्यावर ते दोघे ही आपल्या मुळ गाव बिदनुर येथून फरार झाले होते. त्याचे मोबाईल लोकेशन कधी बंगळुरू तर कधी कोडगू येथे दाखवित असल्याने पोलीसांचे एक पथक त्याच्या शोधासाठी बंगळुरू येथे दाखल झाले होते. तेथून ही ते पसार झाले होते. पोलीस त्याचा शोध घेत असताना हुब्बळी येथे ते दोघे लपून बसल्याचे माहिती पोलीसांना मिळाली. तेथे सापळा लावून ते लपून बसलेल्या ठिकाणाहून माळ मारूती पोलीसांनी त्यांना ताब्यात घेतले.त्यांना बेळगावी येथे आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी करीत असताना त्यांनी आपला गुन्हा मान्य केला. तसेच शोबीतगौडा याने उमा हिच्याबरोबर आपले प्रेमसंबंध मान्य केले. या प्रेमसंबंधात संतोष पद्मान्नवर याचा अडसर ठरत असल्याने आपण तिघांनी मिळून त्यांना मारल्याचे कबुल केले. या घटनेची लेखी फिर्याद माळ मारूती पोलीसांनी मयत संतोष याची मुलगी संजना पद्मान्नावर (वय १९) हिच्याकडून घेतली.तिने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी संतोष दुंडाप्पा पद्मान्नावर (वय ४९) याच्या खून प्रकरणी त्याची पत्नी उमा पद्मान्नवार(वय४५) तिचा प्रियकर शोबीतगौडा (वय ३५) आणि त्याचा मित्र रामनकट्टी (वय ३०) याच्या विरोधात आय.पी.सी.कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. या तिघांना बेळगावी येथील कोर्टात उभे केले असता त्या तिघांना मा.कोर्टाने बेळगावी हिंडलगा येथील जेलमध्ये रवाना केले. या घटनेचा तपास वरिष्टांच्या मार्गदर्शनाखाली माळ मारूती पोलीस करीत आहेत. विवाहबाहय संबंधात महिला जर वाहवत गेली तर ती कोणत्या थराला जाते हेच या घटनेवरून दिसून येते.

## वर्चस्वाच्या वादातून दुष्मनी झाली...

परिसरात नाक्यावर मजुरांची फार मोठी गर्दी असते या मजुरामध्येच काहीतरी वाद होऊन ही घटना घटली असावी असे तर्क-वितर्क नागरिकांतून व्यक्त केले जात होते. शिवाजी चौकात सकाळी नेहमीच गर्दी आसल्याने शिवाजीनगर पोलिसांची आणी वहातुक शाखेची टीम सकाळी गस्तीवर असताना त्यांना सदरील माहिती मिळाली. मिळालेली माहीती वरीष्ठांना देवून गस्तीवरील पोलिसांनी घटनेची प्राथमीक माहीती घेण्यास सुरूवात केली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेला तरूण हा खाडगाव रोड भागातील असून तो वाहन चालक आसल्याची तसेच त्याचे नाव शिवाजी उर्फ अनिल त्र्यंबक देवकर आसल्याची माहीती समोर आली. शिवाजी नगर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दिलीप सागर यांना घटनेचे गांर्भिय ओळखून पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सुधाकर चव्हाण, पीएसआय पाटील, पोलीस हेड कॉन्स्टेबल धैर्यशील मुळे यांना सोबत घेवून घटनास्थळाकडे धाव घेतली. दयानंद गेट परिसरात एका सिग्नल जवळ लोकांनी बरीच गर्दी केली होती. दरम्यानच्या काळात रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या तरूणांचे नातेवाईक घटनास्थळी दाखल झाले होते. रक्ताने माखलेल्या तरूणाच्या बाजूला बसुन काही महीला विलाप करत होत्या. मयताभोवती बघ्यांनी एकच गर्दी केली होती. पोलीस आल्याचे पाहताच लोकांनी गर्दी कमी करण्यास सुरुवात केली. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांनी घटनास्थळावर हजर राहात मयत तरुणाच्या नातेवाईकांचे सांत्वन केले. त्यांच्याकडून अधिक माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. दरम्यान लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी तथा सहाय्यक पोलीस अधीक्षक बी.सी रेड्डी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळाचा परिसर गर्दी मुक्त करून उपस्थित लोकांकडून अधिक माहिती घेण्याचा प्रयत्न केला तसेच पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योग्य ते सूचना देऊन पंचनामा करण्याचे आदेश दिले. तात्काळ शिवाजीनगर पोलिसांनी या खुनातील अधिक माहिती जाणून घेण्यासाठी आणी सक्षम पुराव मिळविण्यासाठी परिसर पिंजून काढला. मात्र घटना घडताच आजूबाजूच्या छोट्या-मोठ्या व्यवसायकांनी आपले दुकान बंद केले होते. त्यामुळे घटना स्थळावर कोणीही प्रत्यक्षदरीशी बोलण्यास तयार नव्हता. जो तो पोलिसांना आम्हाला काही माहीत नाही अशीच उत्तरे देत होता. दरम्यान पोलिसांनी पंचनामा सुरुवात केली. अंगात जीन्स आणि बुटी बुटाची कॉफी कलर चे शर्ट घातलेला तरुण रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. सर्वसाधारण ३० ते ३५ वर्ष वयोगटातील तरुणाच्या मानेवर कित्ती सारख्या धारदार शस्त्राचे वार दिसत होते. मारेकर्यांनी कत्तीचा वार एवढा जोरात मारला होता की कत्ती त्याच्या मानेमध्ये अडकून बसली होती. मयताच्या भोवती रक्ताचा सडा पडला होता. पोलिसांनी आवश्यक ती माहिती गोळा करत पंचनामा आटपून घेतला. उत्तरणी तपासणीसाठी प्रेत शासकीय रुग्णालयात नेण्याची तसबीज केली. मयताची आई विमलबाई त्रंबक देवकर यांच्या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात संशयित आरोपी कृष्णा सुनिल मुद्दे, अजय सुनिल मुद्दे, पद्मीन सुनिल मुद्दे यांच्या विरोधात गुरनं. ४२३/२०२४ कलम १०३(१) व इतर भारतीय न्याय संहीता गुन्हा दाखल करण्यात आला.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, सहाय्यक पोलीस अधीक्षक बीसी रेड्डी, अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे, लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी, शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सूत्रे पीएसआय तानाजी पाटील यांच्या हाती देण्यात आली. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांनी तपासाचे चक्र गतिमान करत शिवाजी उर्फ अनिल त्र्यंबक देवकर खून प्रकरणातील प्राथमिक माहिती घेण्यास सुरुवात केली. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांनी घटनास्थळाचा बारीकने अभ्यास करण्यास सुरुवात केली. मारेकरी एक पेक्षा अधिक असावेत असा अंदाज पोलिसाकडून वर्तवण्यात येत होता. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांनी हा खुन आर्थिक संबंधातून किंवा अनैतिक संबंधातून किंवा पूर्व वैमन्यासातून झाला असावा असा अंदाज व्यक्त करून तपासाची दिशा ठरवली. अधिक माहिती घेण्यासाठी शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे एक पोलीस पथक तयार करण्यात आले. या पोलीस पथकात एपीआय सुधाकर चव्हाण पीएसआय तानाजी पाटील धैर्यशील मुळे हो का विठ्ठल बोळंगे, मंगेश मुळे यांचा समावेश करण्यात आला. या पथकाने शहरातील खाडगाव नगर भागातील दगडी कमानीजवळ राहत असलेल्या देवकर कुटुंबीयांची भेट घेतली. मयत शिवाजी याची अधिक माहीती घेतली असता शिवाजी उर्फ अनिल त्र्यंबक देवकर हा लातूर शहरातील खाडगाव रोडवर असलेल्या दगडी कमानीजवळ आई ,वडील, पत्नी व मुलासह हात होता. महाविद्यालयीन शिक्षण घेतलेला शिवाजी देवकर हा वाहन चालक म्हणून काम करत होता. घरची परिस्थिती बेताची असल्याने त्यांनी टेम्पो ट्रॅव्हलर, ईरटीका अशी वाहने विकत घेतली होती. या वाहनावर वाहनचालक ठेवून तो हे वाहने भाड्याने देण्याची काम करत होता. अधून मधून गाडीला भाडे आल्यास तो स्वतः चालक म्हणून काम करत होता. त्याच्याच शेजारी राहणारे त्याच्या नात्यातील कृष्णा सुनील मुद्दे, अजय सुनील मुद्दे यांना तू लहानपणापासून ओळखत होता. एकाच भागात राहणाऱ्या शिवाजी देवकर आणि कृष्णा सुनील मुद्दे हे नात्याने नातलग आसले तरीही ते चांगलेच मित्रा सारखे वागत होते. कृष्णा सुनील मुद्दे याच्याकडे देखील वाहने भाड्याने देण्याचे काम करत होता. त्याच्याकडे स्वतःच्या मालकीची ईरटीका होती. दरम्यान शिवाजी चौकातील दयानंद कॉलेज गेट जवळ खाजगी वाहने भाड्याने मिळण्याचे वाहन स्थळ आहे. या ठिकाणीच हे दोघे दररोज आपापल्या गाड्या लावून भाड्यांची वाट पहात राहत होते. या वाहन तळावर या दोघांची चांगलीच पकड होती. आपली वाहने भाड्याने गेल्यानंतर इतर वाहनांना भाडे आले तर ते कमिशन बेस वर इतर वाहन चालकांना भाडे देण्याचे काम करत होते. यातून त्या दोघांना बराच आर्थिक फायदा होत होता. दररोज गाडी भाड्याने जाणे आणि इतर वाहनांना कमिशन बेस वर भाडे मिळवून देणे यातून बरीच आर्थिक परिस्थिती सुधारत गेली होती. मात्र आता दयानंद गेट जवळील खाजगी वहान थांब्यावर शिवाजी देवकर आणी कृष्णा मुद्दे यांच्यात वर्चस्वाची चढाओढ लागली होती. काही दिवसापुर्वीच एका महिलेच्या भाड्यावरून दोघात चांगलीच कुरबुर झाली होती. हे प्रेरण विकोपाला गेले होते. तेव्हापासून शिवाजी देवकर व कृष्णा मुद्दे यांच्या कुटूबातही तणावाचे वातवरण तयार झाले होते. अशी गोपीनीय माहीती पोलिसांनी हास्तगत केली. दरम्यान जिल्हा पोलिस अधिक्षकांनी या खून प्रकरणातील आरोपींचा शोध घेण्याचे समांतर आदेश सर्वच पोलिस ठाण्यांना दिले होते. एका गुप्त खबऱ्यांने देवकर खून प्रकरणातील संशयीत आरोपी धाराशिव येथील वडर वस्तीवर लपून बसले आसल्याची खात्रीलायक माहीती दिली. मिळालेल्या माहीती अधारे स्थानिक गुन्हे शाखेचे व शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पथक तयार करून रवाना करण्यात आले होते. सदरचे पथक धाराशिव गाठून तेथील वडरवस्तीवर छापा मारून देवकर खून प्रकरणातील संशयीत आरोपी कृष्णा सुनील मुद्दे ( राहणार बाबा नगर, दगडी कमान, खाडगाव रोड, लातूर.), त्याची आई पद्मीन सुनिल मुद्दे या दोघांना गुन्ह्यात वापरलेल्या ईरटीका कारसह ताब्यात घेण्यात आले.या प्रकरणातील तिसरा संशयित आरोपी अजय सुनील मुद्दे हा उस्मानाबाद बस स्थानकावर पळून जाण्याच्या बेतात असल्याची माहिती शिवाजीनगर पोलीस पथकाला मिळाली. यावरून शिवाजीनगर पोलीस पथकाने उस्मानाबाद बस स्थानकात सापळा लावून पळून जाण्याच्या बेतात असलेल्या अजय मुद्दे याच्या मुस्क्या आवळल्या. त्या तिघांना शिवाजीनगर पोलीस ठाण्यात हजर करताच त्यांनी मागील काळातील घरगुती भांडणाच्या कारणावरून शिवाजी देवकर याचा लोखंडी कत्तीने मानेवर छातीवर मारून खून केल्याचे कबूल केले. या खून प्रकरणात गुन्हेगारांनी वापरलेली शस्त्र, पुण्यात वापरलेली गाडी, रक्ताने माखलेले कपडे पोलिसांनी जप्त केली असून पुढील तपास शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय तानाजी पाटील हे करीत आहेत .सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वातील पथकामधील पोलीस अंमलदार युवराज गिरी, राहुल सोनकांबळे, अर्जुन राजपूत, पोलीस ठाणे शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे एपीआय सुधाकर चव्हाण, पीएसआय तानाजी पाटील, अमलदार काकासाहेब बोचरे, धैर्यशील, विठ्ठल बोळंगे, मंगेश मुळे महिला पोलीस अंमलदार साधना सूर्यवंशी यांनी केली आहे.

## पोलीस मागे लावल्याचा संशय ...

करणारे तर उर्वरीत हे मतदार. काहीही झालं तरी ते त्या पक्षाची कास सोडत नाहीत. हे कार्यकर्ते म्हणजे ज्यास केडर म्हणलं जातं असे. पारंपरिक दृष्ट्या अशी कार्यकर्त्यांची फळी नसली तरी राष्ट्रवादीकडे मोठ्या ताकदवान नेतेमंडळींची भरती आहे व त्यांचा असा सुभा असलेलं क्षेत्र न तिथलं मनुष्यबळ आहे. यांस केडर म्हणतां येणार नाही पण निष्ठावान कार्यकर्ते आहेत. जेव्हा अशी केडर किंवा कार्यकर्त्यांची फळी तयार होते तेव्हा यांमधील बहुसंख्य कार्यकर्ते हे त्यांची आपली राजकीय कारकीर्द कशी उभी राहील हे बघून जमतात असं अलीकडील चित्र आहे. हाडाचे कार्यकर्ते तयार करण्यातसाठी काही लागत नाही असं म्हटलं जातं असले तरी जे काही कार्यकर्ते जमतात ते विचार व उद्दिष्ट यांवर आकर्षित होउन. सचिन कुर्मी हा असाच एक कार्यकर्ता होता जो राष्ट्रवादी काँग्रेसच्या विचाराने भारावून गेला होता. मात्र सामाजिक काम करत असताना त्याची हत्या झाली. सचिन राममुरत कुर्मी (वय ४६) हा भायखळा येथे राहत होते. राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते व मंत्री छगन भुजबळ यांचा जवळचा कार्यकर्ता होता. अनेक वर्षापासून ते भुजबळ कुटुंबियांचे कट्टर समर्थक होते. भुजबळ कुटुंबियांनी अजित पवार यांच्यासह जाण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी सचिन कुर्मी हेदेखील त्याच्यांसह गेले. ते राष्ट्रवादीचे (अजित पवार) भायखळा तालुका अध्यक्ष म्हणून काम करीत होते. ते सामाजिक कार्यात अग्रेसर होते. भायखळा परिसरात पक्षाचे काम करीत असताना समाजातील सर्व घटकांतील कार्यकर्तेसोबत चांगले संबंध होते.आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ते पक्ष बांधणीसाठी कामाला लागले होते. मात्र तपूर्वी काळाने त्यांच्यावर घाला घातला. ५ आक्टोबर रोजी रात्री १२.३० च्या पुर्वी सचिन कुर्मी यांच्यावर भायखळा येथील यूनायटेड मिल क्रमांक ५ ची पाठिमागील बाजूच्या भिंतीजवळ, अनंत गणपत पवार लेन रस्ता, फिरोज फुड्स अॅन्ड फ्लेवरच्या दूकानाजवळ, घोडपदेव या ठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून धारदार व घातक शस्त्राने डोक्यावर, मानेजवळ, पोटावर व शरिराच्या इतर भागांवर वार करून व भोसकून खून केला आणि आरोपी घटनास्थळी वरून पळून गेले. कोणीतरी लगेच एक व्यक्ती जखमी अवस्थेत पडल्याची माहिती पोलीस नियंत्रण कक्षाला कळवली. त्यानुसार जवळच असलेल्या काळाचौकी पोलीस ठाण्याच्या मोबाइल व्हॅनला घटनास्थळी पाठवण्यात आले. जखमी अवस्थेत आढळलेल्या कुर्मी यांना पोलिसांनी तात्काळ जे.जे. रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या मानेवर, हातावर, पोटावर व छातीवर गंभीर जखमा झाल्या असून त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला होता. प्राथमिक तपासात दोन ते तीन अज्ञात व्यक्तींनी त्यांच्यावर धारदार शस्त्राने वार करून हत्या केल्याचा संशय होता. या प्रकरणी भायखळा पोलीस ठाण्यात गु.र.क्र.६८२/२०२४, कलम १०३(१),६१ (२),२३८ भा.न्या. संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. भायखळा तालुका अध्यक्ष सचिन कुर्मी यांची हत्या झाल्याचे समजताच पक्षाचे कार्यकर्ते गोळा झाले. त्यांनी सचिनच्या हत्येचा तपास करून आरोपीला अटक करण्याची मागणी केली. परिसरातील वातावरण बिडू नये म्हणून पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला. सदरचा गुन्हा दाखल झाल्यानंतर तांत्रीक तपास करून तसेच गुप्त बातमीदारांच्या मदतीने या गुन्ह्यातील पाहीजे आरोपीचा शोध घेण्यासाठी वेगवेगळी पथके तयार करण्यात आली. हल्लेखोर दुचाकीवरून तेथे आले व त्यांनी सचिन कुर्मीवर हल्ला केला, या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मंजुषा परब यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक माने यांनी तपास केला असता आरोपी बदलापूर येथे असल्याची माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारावर आनंदा अशोक काळे ऊर्फ आण्या (३९), विजय ज्ञानेश्वर काकडे ऊर्फ पप्या (३४) व प्रफुल्ल प्रवीण पाटकर (२६) या तिघांना ६ ऑक्टोबर रोजी अटक करण्यात आली. यातील आनंदा काळे व विजय काकडे हे दोघेही घोडपदेव परिसरातील रहिवासी आहे.तर प्रफुल्ल पाटकर हा आग्रीपाडा येथे राहतो. यातील काळे ऊर्फ आण्याविरोधात भायखळा, आग्रीपाडा, मानखुर्द, अॅन्टॉपहिल व धारावी पोलीस ठाण्यात मारमारी, हत्येचा प्रयत्न, खंडणी अशा १० गंभीर गुन्ह्यांचा समावेश आहे.तर काकडे ऊर्फ पप्प्याविरोधातही भायखळा पोलीस ठाण्यात मारमारीचा एक गुन्हा दाखल आहे. तसेच पाटकरविरोधात भायखळा, अॅन्टॉपहिल व धारावी पोलीस ठाण्यात तीन गुन्हे दाखल आहेत. आरोपींना याप्रकरणी १५ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलीस ठाण्यात या तीन ही आरोपींची कसून चौकशी केली असता ,आनंदा अशोक काळे ऊर्फ आण्या, विजय ज्ञानेश्वर काकडे ऊर्फ पप्या व प्रफुल्ल प्रवीण पाटकर हे तिघे ही भायखळा परिसरात भाईगिरी करत होते.त्यामुळे त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले होते मात्र सचिन कुर्मीमुळे आमच्या वर गुन्हे दाखल झाल्याचे त्यांना वाटत होते. त्या रागातून त्यांनी सचिन चा काटा काढण्याचा निर्णय घेतला.

५ आक्टोबर रोजी रात्री १२.३० च्या पुर्वी सचिन कुर्मी यांच्यावर भायखळा येथील यूनायटेड मिल क्रमांक ५ ची पाठिमागील बाजूच्या भिंतीजवळ, अनंत गणपत पवार लेन रस्ता, फिरोज फुड्स अॅन्ड फ्लेवरच्या दूकानाजवळ, घोडपदेव या ठिकाणी गाठून आनंदा अशोक काळे ऊर्फ आण्या, विजय ज्ञानेश्वर काकडे ऊर्फ पप्या व प्रफुल्ल प्रवीण पाटकर या तिघांनी सचिनवर धारदार व घातक शस्त्राने डोक्यावर, मानेजवळ, पोटावर व शरिराच्या इतर भागांवर वार करून व भोसकून खून केला आणि ते पळून गेले. सध्या या गुन्ह्याचा तपास मुंबई गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला असून या हत्या संदर्भात आणखी काही या गुन्ह्याची कारणे आहेत हे तपासून पाहण्यात येत आहेत.गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सदानंद येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## अंगणवाडीसेविकेला एकांतात गाठले ...

मारुतीवाडी येथील अंगणवाडीत सेविका म्हणून कार्यरत होत्या. काल गुरुवारी त्या नेहमीप्रमाणे अंगणवाडीत गेल्या होत्या. परंतु सायंकाळी उशिरापर्यत परत आल्या नाहीत. नातेवाईक व ग्रामस्थांनी अंगणवाडीची पाहणी केली असता त्यांना अंगणवाडीला बाहेरून कुलूप लावल्याचा आढळले. ग्रामस्थांनी आत डोकावून पाहिल, तेव्हा त्यांना रक्ताचे डाग दिसले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी रात्री उशिरापर्यंत शोध घेतला. परंतु कुठल्याही प्रकारची माहिती मिळाली नाही. महिले अंगणवाडी सेविकेचा शोध घेत असताना अंगणवाडीपासून साधारण २५ ते ३० मीटर अंतरावर असलेल्या एका बंधाऱ्यांमध्ये सेविकेचा मृतदेह मिळून आला. मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात आणण्यात आलेला आहे. याप्रकरणी अंगणवाडी परिसरातच राहत असलेल्या एका व्यक्तीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केलेली आहे.

28 OCTOBER TO 03 NOVEMBER 2024 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 10/26/2024 10:26 PM Page 1



# उभ्या भात पिकांवर पाणी फिरल्याने शेतकरी हवालदिल

## तातडीने पंचनामे करण्यात येणार असल्याचे कृषी अधिकाऱ्यांचे आश्वासन




**वाडा/प्रतिनिधी**

गेल्या कित्येक दिवसापासून वाडा तालुक्यात परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला असून भातशेतीची दाणादाण उडवली आहे. मोठ्या प्रमाणात भात शेतीचे नुकसान झाले आहे. तरी शेतकऱ्यांकडे पाहण्यासाठी राजकीय पक्षांच्या नेत्यांना वेळ नाही, असा आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. सध्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात सगळेच लोकप्रतिनिधी गुंतले आहेत. अद्यापही तालुक्यात पाऊस सातत्याने कोसळत आहे. यामुळे उभ्या भात पिकावर पाणी फिरले गेले आहे. यावर्षी समाधानकारक पाऊस पडल्याने भात शेती देखील बहरली होती. मात्र, पावसामुळे भातशेतीचे अतोनात नुकसान झाले असल्याने तत्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी शेतकरी करीत आहेत. विधानसभा निवडणुकांचा हंगाम सुरू झाला असल्याने लोकप्रतिनिधी सत्तेसाठी प्रचारामध्ये मग्न आहेत. तर अधिकारी कामात व्यस्त झाले आहेत. शासकीय कार्यालयातील कर्मचारी निवडणूक कामासाठी इतरत्र जात असल्याने कार्यालयांमध्ये देखील शुकशुकाट पहावयाला मिळत आहे. आधीच कर्मचाऱ्यांचा तुटवडा असलेली कार्यालये आता मोकळी झाली आहेत. यामुळे सातत्याने भात शेतीचे नुकसान होत असले तरी शेतकऱ्यांना कोणी वाली उरलेला नाही. असा प्रश्न निर्माण झाला आहे त्यामुळे संताप व्यक्त करण्यात येत आहे.सध्या भाताच्या लोंबी शेतकऱ्यांनी भात कापणीची तयारी केली होती. मात्र गेल्या काही दिवसापासून सातत्याने पाऊस पडत असल्याने भात पीक कापणी देखील लांबणीवर गेली आहे. शेतामध्ये पाणीच पाणी साचल्याने भात शेतीचे नुकसान झाले आहे. दरम्यान प्रशासनाच्या वतीने तलाठी, कृषी विभाग, ग्रामसेवक यांच्याकडून भात शेतीच्या पंचनाम्याची कामे हाती घेण्यात आली असून तातडीने पंचनामे करण्यात येणार आहेत, असे तालुका कृषी अधिकारी हरेश माकर यांनी स्पष्ट केले आहे.

# कालिदास सूर्यवंशी व संचाला प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल भव्य सत्कार

**देवणी/प्रतिनिधी**



बुद्ध, बसवा फुले शाहू आंबेडकर प्रबोधनात्मक भिम गिते व राज्यस्तरीय भजन संगीत स्पर्धा काल बिदर इथे पार पडला धम्मचक्र परिवर्तन दिन निमित्ताने दरवर्षाप्रमाणे यंदा ही बिदर शहरामध्ये पूज्य चन्नबसव पट्टदेवार नाट्यगृहात नुकत्याच झालेल्या भीमगीतेच्या राज्यस्तरीय भजन संगीत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा उद्देश कारण की ज्या ज्या महापुरुषाने आपल्या विचाराच्या माध्यमातून या समाजाला घडविले या देशाला घडविले त्याच महापुरुषांचे विचार जिवंत ठेवण्यासाठी त्यांच्या विचाराला उजाळा देण्यासाठी कर्नाटक राज्यात बिदर जिल्ह्यामध्ये राज्यस्तरावर दरवर्षाला मोठ्या प्रमाणात हा कार्यक्रम आयोजित केला जातो, तरी या स्पर्धेमध्ये सहभागी राज्यातील व राज्यभरातून विविध जिल्ह्यांतील तालुक्यातील कलाकार उपस्थित राहुन या स्पर्धेमध्ये भाग घेतला होता तर प्रत्येक कलाकाराने कन्नड हिंदी मराठी तेलगू या भाषांमध्ये संगीताच्या माध्यमातून बुद्ध बसवा फुले शाहू आंबेडकर त्यांच्या जीवन चारित्र्यावरती प्रबोधनआत्मक आपआपली गीते सादर केली तरी या स्पर्धेमध्ये जवळपास ५० संच सहभाग घेतला होता. पहिल्या राऊंडमध्ये प्रत्येक कलाकारांना एक एक गीताची संधी देण्यात आली होती. शेवटच्या टप्प्यामध्ये संगीत छत्रा मधले संगीत विशारद जेजेस परीक्षक म्हणून शंभू लिंग वालदोडी रामचंद्र कर्मवीर डॉक्टर बसवराज उज्वले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रथम द्वितीय तृतीय अंतिम निर्णय करून स्पर्धकांची निवड करण्यात आली. राज्यस्तरीय स्पर्धामध्ये प्रथम विजेते भालकी तालुक्यातील आटरगा गावचे महाराष्ट्र व कर्नाटकातील या सीमा भागातील सुप्रसिद्ध भिम शाहीर कालीदास सूर्यवंशी आटरगेकर व त्यांचा संच गेल्या वर्षी आणि याही वर्षी परत एक बार दुसऱ्यांदा सुद्धा राज्यातून पहिल्या क्रमांकावर हा विजय प्राप्त करून घेऊन हा यश मिळवलेला आहे. तरी पंचशील साहित्य परिषद या संस्थेकडून यांना रु२१००० हजार पारितोषक देऊन हा स्पर्धेचा राज्यातून पहिला विजेता म्हणून भिम शाहीर कालिदास सूर्यवंशी अटकेकर यांना सन्मानित करून गौरव करण्यात आला आहे दृतिय विजेता बिजापूर जिल्ह्यातील बागेवाडीच्या सोमेश्वर कन्नड भजन संघाने दुसऱ्या क्रमांकावर १०,०००, हा विजय प्राप्त केला तृतीय विजेता बसवकल्याण तालुक्यातील गुती जय भीम कला पथकाने तिसऱ्या क्रमांकावर ५,००० विजय प्राप्त करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक श्री श्री सिद्धराम शरणु बेलदाळ स्वामी कार्यक्रमाचे दिव्य सानिध्य पूजे भंन्ते धम्मानंद जी व भंन्ते ज्ञान सागर जी कार्यक्रमाचे अध्यक्ष लक्ष्मण कांत कांचे हे होते कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून अनेक नेतेगण कन्नड साहित्य परिषदेचे जिल्हा युनिट अध्यक्ष सुरेश चनशेट्टी, अर्जुन कांचे, रमेश डाकुलगी, विश्वनाथ दीने, रुद्रय्या आर. प्रशांत दोड्डी, पंढरी पुजारी, बी. कृष्णप्पा, दलित संघर्ष समिती नेते राजकुमार मूलभारती, चंद्रकांत निरटे, विजयकुमार सोनारे, अंबादास गायकवाड प्रसिद्ध सिंगर बेरु सिंग जी भिम शाहीर कालीदास सूर्यवंशी आटरगेकर.

# नवी मुंबईत भीषण अपघात तीन ठार!

नवी मुंबई : आज पहाटे वाशी खाडी पुलावर झालेल्या भीषण अपघात दोन पुरुष आणि एका महिलेचा मृत्यू झाला आहे. मुंबई मार्गिकेवर सदर अपघात झाला असून अपघातात मृत्यू झालेल्याची नावे अद्याप समोर आलेली नाहीत. पनवेल कडून मुंबईच्या दिशेने एक एर्टीगा गाडी जात होती. पहाटे साडे चारच्या सुमारास गाडी चालकाचे वेगावरील नियंत्रण सुटले आणि गाडीने समोरील एका चालत्या डंपरला जोरदार धडक दिली. अपघात एवढा भीषण झाला की गाडीतील एक पुरुष आणि एका महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघातग्रस्त गाडी बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली आहे. पुढील कारवाई वाशी पोलीस करीत आहेत. अशी माहिती वाहतूक पोलीस निरीक्षक दिलीप गुजर यांनी माध्यमांना दिली.

# सर्व निर्णय घेण्याचे अधिकार पालघर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे गेल्याने जव्हार येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय अधिकाराविना पडली ओस!

**जव्हार/प्रतिनिधी**



जव्हार तालुक्यातील वावर वांगणी कुपोषित बालमृत्यूच्या घटनेनंतर महाराष्ट्र शासनाने ठाणे येथील प्रमुख कार्यालयाची उप जिल्हा कार्यालये ही जव्हार येथे हालविण्यात आली. त्यानंतर जव्हार, विक्रमगड, मोखाडा या तालुक्यांच्या विकासाला खर्या अर्थाने गती मिळाली. परंतु २०१४मध्ये ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन पालघर जिल्हा झाला व सर्व जिल्हा कार्यालये पालघर येथे सुरू झाली. त्यामुळे जव्हार येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या अधिकारांवर गदा आली आणि सर्व निर्णय घेण्याचे अधिकार पालघर जिल्हाधिकारी यांना गेले. यामुळे जव्हार येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय अधिकाराविना ओस पडले आहे.

२०१४ मध्ये पूर्वीच्या ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून नवीन पालघर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. त्यामुळे शहरी, सागरी भागासह डोंगरी भागातील सर्व सामान्य नागरिकांचे वर्षानुवर्षे रखडलेले प्रश्न मार्गी लागतील. त्यांच्या हाताला काम मिळेल, शासकीय कामे लवकर होतील खऱ्या अर्थाने जनमानसांच्या विकासाला चालना मिळेल हा त्यांच्या पाठिमागचा हेतू होता. परंतु पालघर जिल्ह्याला मूर्त स्वरूप आल्याने सर्व प्रमुख शासकीय कार्यालये पालघर येथे गेली आणि जव्हार येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी अधिकाराविना ओस पडले आहेत. यामुळे जव्हार, मोखाडा, विक्रमगड तालुक्यातील नागरिक कामानिमित्त जव्हार ला येण्याऐवजी थेट पालघर गाठू लागले आहेत. त्यातही जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी गेल्यानंतर सामान्य नागरिकांची कामे कधीही एकाच फेरीत होत नाहीत. राजकीय नेतेमंडळी, ठेकेदार यांचा अपवाद वगळला तर सामान्य नागरिकांना दोन ते तीन फेर्या माराव्या लागत आहेत. मोखाडा येथून पालघर जिल्ह्याला जायला सकाळी सात वाजताची बस सोडली तर त्यानंतर थेट दुपारी अकरा बारा वाजता बसेस आहेत आणि पालघर येथून माघारी येण्यासाठी सायंकाळी पाच वाजेनंतरची बस गेल्यावर मोखाड्याला यायला बस नाही, असे नागरिकांचे म्हणणे आहे. तसेच पालघर सारख्या ठिकाणी मुक्कामी राहायची पण अडचण होत असते. त्यामुळे आदिवासी नागरिकांची ससेहोलपट थांबावी यासाठी जव्हार येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाला नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने काही अधिकार देण्याची मागणी होत आहे. दरम्यान पुर्वीचे अधिकार आणि आता असलेले अधिकार यांच्यात बराचसा फरक आहे. पालघर जिल्हाधिकारी यांना अधिकार जास्त आहेत, असे जव्हार कार्यालयाचे अप्पर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फंटागरे यांनी सांगितले.

# भिवंडी अंजुरफाटा येथे रेशनिंगचा १२ टन तांदूळ काळा बाजारात विक्री करताना जप्त



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी अंजुरफाटा येथील राष्ट्रीय खाद्य निगमच्या गोदामातून शिधावाटप यंत्रणेचा १२ टन तांदूळ कल्याण येथील शिधावाटप दुकानांत विक्री करण्यासाठी वितरीत करण्या साठी घेऊन जात असताना ट्रक क्रमांक एम एच ०४ जी सी २७५६ च्या चालकाने ट्रक मधील जीपीएस यंत्रणा बदलून साईबाबा राजनोली नाका येथून आपला ट्रक हा मुंबई नाशिक महामार्गावरून पडघा पोलीस स्टेशनच्या हद्दीत वाशेरे गावात विक्री करता घेऊन निघाला. याची माहिती कल्याण येथील खडकपाडा पोलिसांना मिळताच पोलिसांनी ट्रकचा पाठलाग केला. सदरच्या ट्रक मधील ४ लाख ८० हजार रुपये किमतीचा २४० गोणींमधील १२ हजार किलो तांदूळ भादाणे येथील जय आनंद फूड इंडस्ट्रीज च्या गोदामात उतरवत असताना पोलिसांनी जप्त केला आहे. शिधावाटप अधिकारी यांच्या तक्रारी नंतर कल्याण खडक पाडा पोलिसांनी ट्रक चालक आशिष रमेश जगताप यास ताब्यात घेऊन सदरचा तांदूळ जप्त करून जय आनंद फूड इंडस्ट्रीज कंपनीस सिल ठोकले असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# कै. रसिका महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांची पुणे व लातूर शिक्षण मंडळावर निवड

**देवणी/प्रतिनिधी**



महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे व लातूर विभागीय मंडळावर सदस्य म्हणून कै. रसिका महाविद्यालय, देवणी येथील प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांची महाराष्ट्र शासनाने मंडळ सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. प्राचार्य डॉ.चंद्रकांत जावळे यांना ३० वर्षे अध्यापनाचा अनुभव असून त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ७० संशोधन पेपर प्रकाशित झाले आहेत. यापूर्वी त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. तसेच नेपाळ, श्रीलंका या देशात आंतरराष्ट्रीय परिषदेच्या निमित्ताने त्यांनी अभ्यास दौरा केलेला आहे. त्यांच्या कार्यकाळात कै. रसिका महाविद्यालयाने NC चा B++ दर्जा प्राप्त केलेला आहे. मागील चार वर्षापासून ते प्राचार्य पदाची धुरा यशस्वीपणे सांभाळत आहेत. अनेक राष्ट्रीय पातळीवरील संशोधन परिषदेचे त्यांनी यशस्वी आयोजन केले आहे. वृक्षारोपण, रक्तदान, अनाथ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप असे विविध सामाजिक उपक्रम ते सातत्याने राबवत असतात. त्यांच्या या निवडीबद्दल संस्थाध्यक्ष गोविंदरावजी भोपणीकर, संस्थासचिव गजाननजी भोपणीकर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# कापड व्यापाराच्या संघटनेच्या अध्यक्ष पदी शरण लुल्ले, तर उपाध्यक्ष मुनाफ वलांडीकरे



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी शहरातील कापड व्यापाऱ्यांची बैठक संपन्न झाली या बैठकीला सर्व कापड व्यापारी हजर होते. सर्वानुमते काही निर्णय मान्य करण्यात आले त्यापैकी एक कापड व्यापाऱ्यांची वेगळी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये अध्यक्ष म्हणून शरण मनोहर लुल्ले, तर उपाध्यक्ष म्हणून मुनाफ पशामिया वलांडीकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली व सचिव म्हणून माधव लक्ष्मणराव मोरे यांची निवड करण्यात आली. त्यानंतर सल्लागार म्हणून मिथीलेश मोदी, संजय जगदीश जिवणे, फरहान मोमीन, अर्जुन गायकवाड, शुभम वाघमारे, विशाल विश्वास मोदी, उमाकांत संते, विशाल अंबुलगे, सुनील वसंतराव जाधव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली या निवडी बद्दल सर्व स्तरातून अभनंदनचा वर्षाव होत आहे.



## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिति 'डी' आचोळे, नालासोपारा (पु.)**
**(दुरध्वनी क्रमांक ७२१९३७०००६/७२१९३७०००९)**

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिति 'डी' कार्यालय आचोळे नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिति 'डी' कार्यालय आचोळे नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | आचोळे-०५ | ११९/१८ | ३३२९ | विरेंद्र प्रताप सिंग | हुसेन भाई मोहम्मद भाई पाणवधु |
| २. | आचोळे-०२ | १६६/१२ | ३३३१ | रमेश जो करकेरा | नारायण सुबोल दास व शिबानी ना. दास |
| ३. | आचोळे-९/२ | ६३३/५४५ | ३३३४ | प्रिन्स विनोद राजपुत | विकास प्रवीण शुक्ला |
| ४. | आचोळे-१० | ४९५/१२७ | ३३३६ | किशोर सखाराम साळुंखे व काव्या किशोर साळुंखे | गौरव गजानन जाबरे |
| ५. | आचोळे-०४ | २०७/५६ | ३३३८ | तेरेजा दुमा सोज व इतर | मनोज तुकाराम मंचेकर |
| ६. | आचोळे-०५ | ११२/१४ | ३३४० | अब्दुल कादर अब्दुल्ला शेख | मीना सिंह |
| ७. | आचोळे-१० | ४०५/५ | ३३४२ | भावना थंडाणी | संदीप पी.दुबे व संगीता संदीप दुबे |
| ८. | आचोळे-१० | ९/१० | ३३४४ | स्टार लॅन्ड प्रा.लि. | संदीप पी. दुबे व संगीता संदीप दुबे |
| ९. | आचोळे-१० | ३९७/१७ | ३३५७ | बंसाल राजेश चिमनलाल | सतीश लालजी यादव व राहुल यादव |
| १०. | आचोळे-१० | ३९७/१७ | ३३५४ | पायोनियर बिल्डर्स | प्रीती देव चिपटे व देव तुकाराम चिपटे |
| ११. | आचोळे-१० | ३९८/२३ | ३३५६ | अमृत भूषण | माया विनोद जायसवाल व विनोद पन्नालाल जायसवाल |
| १२. | आचोळे-१० | ४६८/६१ | ३३५८ | ब्राझील सिमॉईस व जसींटा ब्राझील सिमॉईस | स्वप्निल अरुण वावेकर व नमिता स्वप्निल वावेकर |
| १३. | आचोळे-०६ | १३८/२० | ३३६० | सुरेश कदम | अर्जुन राध्येश्याम कामत व स्वेता अर्जुन कामत |
| १४. | आचोळे-१० | ३४५/१११ | ३३६२ | दिपक बी. राणे | जितेंद्र नाथ पांडे व सुमन जितेंद्र पांडे |
| १५. | आचोळे-०८ | ३२/२७ | ३३६४ | विठ्ठल परमेश्वर नाईक | रत्नमाला संजय पाटोळे |
| १६. | आचोळे-०८ | ९४/४१ | ३३६८ | रांभा राजेंद्रप्रसाद यादव | श्रीराम पाण्डेय |
| १७. | आचोळे-१० | ४७२/१६३ | ३३७१ | विभा भास्कर | महेंद्र भवानजी मोमाया व निधी महेंद्र मोमया |
| १८. | आचोळे-९/१ | ५७४/१६ | ३३७३ | बिनोय एस. वर्गीस व सिनी बी. वर्गीस | अविनाश आर.सिंह व निलम अविनाश सिंह |
| १९. | आचोळे-०९ | ६१२/५४ | ३३७६ | महेंद्र सोमा कांदर | मंगेश कुमार लालता प्रसाद राय |
| २०. | आचोळे-०८ | ११९/३६ | ३३७९ | बाबूलाल आर. यादव | सुरज अनिलकुमार जयस्वाल व सुमित अनिलकुमार जयस्वाल |

जावक क्र. वविशम/कवि/२०२४/२०२४-२०२५
दिनांक : २४/१०/२०२४

सही/-
**प्र. सहा.आयुक्त**
प्रभाग समिति 'डी' आचोळे
वसई विरार शहर महानगरपालिका

28 OCTOBER TO 03 NOVEMBER 2024 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 10/26/2024 10:27 PM Page 1



# कुणास ठाऊक कोण कुठले राजकीय उंदीर पळत सुटले!

महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांसाठी येत्या २० नोव्हेंबरला निवडणूक आहे. मात्र ही निवडणूक इतर निवडणुकांपेक्षा वेगळी आहे आणि या निवडणुकीत मतदारांची दिशाभूल करण्यासाठी सगळ्याच पक्षाने आपापल्या पद्धतीने मोर्चे बांधणी सुरू केलेली आहे. त्याचबरोबर दुसऱ्यांवर घराणेशाहीचा आरोप करणारे काही राजकीय पक्ष, आपल्याच पक्षातील एकाच घरातील बाप, मुलगा, सून, मुलगी यांना तिकीट वाटून घराणे शाही भारतीय राजकारणात किती दृढ झाली आते ते दाखवून देत आहेत. दुर्दैवाने या सगळ्या गोष्टीचा इथले मतदार विचार करीत नाहीत. कारण मतदार राजकीय पक्षांचे आणि त्यांच्या नेत्यांचे अंधभक्त बनलेले आहेत. त्यामुळे या अंधभक्तांना आपला पक्ष, आपला राजकीय नेता, निवडणुकीत कशा पद्धतीने आपल्याला फसवतोय याकडे त्यांची बघायची इच्छाच नाही आणि एकदा का निवडणूक झाली आणि आमदार म्हणून त्यांचा नेता निवडून गेला, की मग पाच वर्ष कोण कुठला कार्यकर्ता आणि कसले निष्ठावान? या सगळ्या गोष्टी इतिहास जमा होतील. त्यामुळे अशा पद्धतीच्या निवडणुका जर होणार असतील. तर या असल्या घाणेरड्या लोकशाही पद्धतीच्या निवडणुकीपेक्षा हुकुमशाही परवडलीअसे वाटते. कधी कधी तर असं वाटायला लागतं की इंग्रज होते तेच बरे होते. पण लोकशाहीच्या नावाने या देशात जे किळसवाणे प्रकार सुरू झालेले आहेत ते अत्यंत भयंकर आहेत .या निवडणुकीच्या निमित्ताने महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्या किती तकलादू आहे ते दिसून आले. निवडणुकीत अर्ज भरण्याची शेवटची तारीख जवळ आली तरी अजूनही महाविकास आघाडीमध्ये पंधरा ते वीस जागांचा घोळ कायम आहे. मग जे लोक निवडणुकीत वेळेवर जागावाटप करू शकत नाहीत. ते लोक निवडून गेल्यानंतर व त्यांचे सरकार आल्यानंतर लोकांचे काय प्रश्न सोडवणार? महाविकास आघाडीच्या जागा वाटपाचा हा घोळ काही आजचा नाही. मागील लोकसभा निवडणुकीत सुद्धा असाच घाणेरडा प्रकार घडला होता. आणि आताही त्याचीच पुनरावृत्ती झालेली आहे. त्यामुळे या लोकांकडून फारशा अपेक्षा ठेवण्यात काहीही अर्थ नाही. अरे तुम्हाला जर जातीयवादी पक्षांना खरोखरच हरवायची मनापासून इच्छा असती, तर तुम्ही जागांच्या संख्याबळांचा घोळ घालत राहिला नसता. महाविकास आघाडी म्हणून भलेही एखाद्या पक्षाला कमी जागा मिळाल्या आणि दुसऱ्या पक्षाला जास्त जागा मिळाल्या, तरी शेवटी महाविकास आघाडीचेच संख्याबळ वाढले असते आणि कदाचित सरकार ही आले असते. मग जागांवरून घोळ कशासाठी? महाविकास आघाडीच्या या जागांच्या घोळामुळे लोक महाविकास आघाडीवर सुद्धा नाराज झालेले आहे. महाराष्ट्र हा शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांवर चालणार आहे आणि कोणत्याही परिस्थितीत या महाराष्ट्रातून जातीयवादी भाजपाला हद्दपार करायचा आहे. त्यासाठी भाजपा आणि त्यांच्यासोबत सत्तेच्या लालसेने गेलेले शिंदे आणि अजित पवार यांचे गट या तिघानाही महाराष्ट्राला धडा शिकवायचा होता. परंतु महाविकास आघाडीतील पक्षांवरही आता लोकांचा विश्वास राहिलेला नाही. कारण जर जातीयवाद्यांना सत्तेतून घालवणे हे एकमेव टार्गेट त्यांचे असते, तर त्यांनी त्याच दृष्टीने महाविकास आघाडीची वाटचाल सुरू ठेवली असती. पण आज परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की, जागा वाटपावरून महाविकास आघाडीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. हा सगळा प्रकार संताप जनक आहे. राहता राहिला सवाल महायुतीचा! तर महा युतीतील प्रमुख पक्ष आहे भाजपा आणि भाजपाचा आजवरचा इतिहास पाहता आपल्या सोबत असलेल्यांचा वापर करून घ्यायचा आणि नंतर त्याला तांदळातल्या खड्यासारखे उचलून बाहेर फेकायचे. शिवसेनेच्या बाबतीत तेच झालं. २३ वर्ष शिवसेना भाजपाची मैत्री होती. भाजपाने आपला जनाधार वाढवण्यासाठी बाळासाहेबांच्या नावाचा आणि शिवसेनेच्या संघटनात्मक ताकतीचा महाराष्ट्रात वापर करून घेतला आणि जशी भाजपाची ताकद वाढली तसे शिवसेनेचे दोन तुकडे केले. हा इतिहास ठाऊक असतानाही अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासारखे लोक भाजपा बरोबर गेले. पण महायुतीच्या जागा वाटपाच्या वेळी शिंदे आणि अजित पवार यांना जो अनुभव आलेला आहे. तो अत्यंत भयंकर आहे. ठाणे हा शिंदेंच्या शिवसेनेचा बालेकिल्ला! पण तिथे शिंदे यांच्या हाती काय लागले, फक्त त्यांची एक कोपरी पाचपाखडीची जागा, आणि प्रताप सरनाईक ची ओवळा मजिवड्याची जागा! या दोनच जागा शिंदे यांच्या हाताला लागल्या .बाकीच्या ठिकाणी भाजपाने बेल प्लॅन कब्जा केला. हे सगळं यापुढेही असेच होणार आहे. मागच्या वेळेला अमित शहा जेव्हा महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले होते, तेव्हा त्यांनी स्पष्टपणे सांगितलं होतं की २०२४ मध्ये महायुतीचे सरकार येणार, परंतु २०२९ मध्ये मात्र भाजपाचे स्वबळाचे सरकार सत्तेवर येणार. अमितशांच्या त्या विधानातून भाजपसोबत जे फरपटत चाललेले लोक आहेत, म्हणजे शिंदे आणि अजित पवार यांनी धडा घ्यायला हवा होता. २०२४ साली भलेही महायुती सत्ता आली तरी २०२९ पर्यंत म्हणजे पाच वर्षाच्या त्यांच्या कालावधीत भाजपा, शिवसेना शिंदे गट आणि अजित पवारांची राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांना पूर्णपणे संपवणार आहे आणि त्या वेळेला शिंदे सोबत किंवा अजित दादा सोबत जे लोक फरफडत गेले आहेत, त्यांची अक्कल ठिकाणावर येईल. सुदैवाने अजित पवारांसोबत गेलेल्या काही लोकांना भाजपाच्या या गनिमी काव्याचां सुगावा लागला होता. त्यामुळे शिंदेंच्या शिवसेनेतील आणि भाजपातील ही काही लोक शरद पवारांकडे गेले. शरद पवारांकडे जाणाऱ्यांची दिवसेंदिवस गर्दी वाढत आहे. भाजपात गेल्यावर शांत झोप लागते असे म्हणणारे, इंदापूरचे हर्षवर्धन पाटील यांच्यावर भाजपा सोडून शरद पवारची तुतारी हाती घेण्याची का वेळ आली? याचा लोकांनी विचार करायला हवा. त्याचबरोबर सोलापूरच्या मोहिते पाटील गटाचे लोक आज शरद पवारांकडे का परतले त्याचाही विचार करायला हवा. अजित पवार हे शरद पवारांपेक्षा वयाने आणि अनुभवाने ही लहान आहेत आणि शेवटी बाप अखिर बाप होता है! ही एक म्हण आहे. त्यानुसार अजित पवार यांनी सत्तेच्या लालसेने किती जरी उड्या मारल्या, तरी बारामती हा शरद पवारांचा गड आहे. हे मागच्या लोकसभा निवडणुकीत शरद पवारांनी अजित पवारांना दाखवून दिले. म्हणूनच यावेळी विधानसभेची निवडणूक लढवताना अजित पवार यांची छाती धडधडते आहे. कुटुंबातले लोक तर त्यांच्या विरोधातच आहेत. पण बारामतीत शरद पवारांवर विश्वास असलेले बहुसंख्य लोक उद्या पवारांच्या पुढच्या पिढीच्या म्हणजे योगेंद्र पवार यांच्यासारख्या तरुणाला निश्चितपणे निवडून देण्याचा विचार करतील. त्यावेळेला अजित पवारांना त्यांचे औकात कळेल. या निवडणुकीत आणखी एक चित्र बघायला मिळत आहे ते म्हणजे २७ मतदार संघांमध्ये शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत होणार आहे. भाजपाने दाणे टाकून पूर्वी एकाच पक्षात असलेल्या दोन शिवसैनिकांना या निवडणुकीत झुंजवण्याचा अत्यंत घाणेरडा डाव टाकला आहे. त्याला शिंदे कडे गेलेले शिवसैनिक बळी पडले. आता शिवसेनेवर बाळासाहेब ठाकरेंच्या शिवसेनेवर प्रेम करणाऱ्या माणसाने एकनाथ शिंदे सारख्या फुटीराच्या शिवसेनेला का मत द्यावे? आणि भाजपाचे हात का बळकट करावे? असा सवाल मतदार करीत आहेत. या देशातील लोकशाही आणि संविधान वाचवण्याची जबाबदारी आज बुद्धिजीवी वर्गावर आहे. ज्यांना शिवसेना आणि राष्ट्रवादीतील फूट अजिबात मंजूर नाही. असे लोक अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही. याचे कारण भाजपाने जागा वाटपात ज्या पद्धतीने अजित पवार आणि शिंदेंच्या शिवसेनेला पद्धतशीरपणे बॅकफूटवर ढकलले. ते पाहून तरी शिंदेंचे आणि अजित पवार यांचे डोळे उघडतील अशी अपेक्षा आहे. आणि तसे झाले नाही तर ही निवडणूक शिंदे आणि अजित पवारांसाठी त्यांच्या पक्षाच्या अस्तित्वाची शेवटची निवडणूक ठरणार आहे. तसे पाहता निवडणुका जाहीर झाल्या की आयाराम गयाराम यांची पळापळ सुरू होते. बुडणाऱ्या झाजवरचे उंदीर पटापट उड्या टाकतात आणि सुरक्षित स्थळी आसरा घेतात. अगदी तशीच परिस्थिती आज महाराष्ट्रातील राजकीय पक्षांमध्ये असलेल्या उंदरांची झालेली आहे. जिथे तिकीट मिळाले नाही किंवा तिकीट मिळण्याची शक्यता नाही. अशा पक्षातून दुसऱ्या पक्षात उड्या मारणाऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे अशा लोकांवर महाराष्ट्रातील मतदाराने विश्वास टाकावा का? हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे या सगळ्या घाणेरड्या राजकारणाला कंटाळलेले लोक यावेळी निश्चितपणे वेगळा निर्णय घेतील अशी महाराष्ट्राला अपेक्षा आहे.

# ‘दिवाळी’निमित्त वसई-विरार शहरातील बाजारपेठा सजल्या

वसई/प्रतिनिधी



दीपावलीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असल्याने सगळीकडे ग्राहकांची लगबग सुरू झाली आहे. अनेक ठिकाणी मोठय़ा मोठय़ा बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. दिवाळीनिमित्ताने लागणाऱ्या वस्तू व इतर वस्तू खरेदीसाठी ग्राहकांनी मोठी गर्दी बाजार पेठेत केल्याचे चित्र शहरात सर्वत्र पाहायला मिळत आहे. बाजारात कपडे, फराळ, कंदील, पणत्या, रांगोळी, सुगंधी आयुर्वेदिक उटणे, मध, आयुर्वेदिक औषधे व विविध प्रकारच्या शोभेच्या वस्तू, घरगुती पदार्थ, अनेक महिलांनी घरी बनवलेल्या वस्तू अशा अनेक गोष्टी बाजारपेठेत विक्रीसाठी आल्या आहेत. या वस्तू खरेदीसाठी मोठय़ा संख्येने ग्राहकांनी मोठी गर्दी करू लागले आहेत. यंदाच्या दिवाळीत ग्राहकांनी जास्त प्रमाणात घरगुती बनवलेले पदार्थ आणि शोभेच्या वस्तू यांना प्राधान्य दिले आहे. त्यासाठी वसई-विरार शहरातही अनेक ठिकाणी महिला बचत गटाच्या वतीने अशा प्रकारच्या बाजारपेठांचे प्रदर्शन भरवण्यात आले आहेत. त्यामुळे एकाच ठिकाणी सर्व काही वस्तू दिवाळीच्या निमित्ताने मिळू लागल्याने सामान्य ग्राहकांनीही समाधान व्यक्त केले आहे. विरारमध्ये स्वयंप्रेरित आणि स्वयंप्रेरणा या महिला बचत गटानेही अशाच प्रकारे सिटी फेअर शॉपिंग कार्निव्हलचे आयोजन केले आहे. त्यामुळे घरगुती पदार्थ व इतर वस्तू बनवणाऱ्या महिलांना चांगल्या प्रकारे रोजगाराची संधी मिळाली आहे. अनेक महिलांनी उद्योग क्षेत्रात येऊन आपल्या घरी बनवलेले पदार्थ आणि वस्तू ग्राहकपेठेत आणून विक्री करावी. ज्यामुळे महिलाही आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील आणि त्यांनाही नवी उमेद मिळेल. या उद्देशाने वेगवेगळ्या सण-उत्सवात अशा प्रकारच्या बाजारपेठा भरवल्या जात जातील, असे सांगण्यात आले. दरम्यान दिवाळीसाठी लागणाऱ्या सजावटीच्या साहित्याच्या किंमती आजकाल प्रचंड महागल्या आहेत. मनासारखा कंदील हवा असेल तर ५०० रुपयांची नोट मोडावीच लागते. मात्र मुंबईत एक ठिकाण असं आहे जिथं तुम्हाला फक्त ५० रुपयांमध्ये अतिशय सुरेख, नाजूक, आकर्षक असं कंदील मिळू शकतं. तिथं १०० रुपयांपासून तर एकापेक्षा एक कंदील मिळतात. माहिमच्या कंदील गल्लीत छत्रपती शिवाजी महाराज, श्री स्वामी समर्थ महाराजांचा फोटो असलेल्या कंदिलाला विशेष मागणी आहे. दिसायला अतिशय सुंदर असे हे कंदील सर्वसामान्य व्यक्तींना परवडतील अशाच दरात मिळतात. या कंदिलांनी आपली दिवाळी खऱ्या अर्थानं चैतन्यमय होऊ शकते. लहान आकाराच्या कंदिलांची सुरुवात होते ५० रुपयांपासून, तर आणखी नक्षीदार मोठ्या आकाराचे कंदील मिळतात ३०० रुपयांना. पुठ्ठ्यांचे, दुमडता येतील असेही कंदील इथं उपलब्ध आहेत. जर डझनभर कंदील एकत्र घेतले तर ५० रुपयांची सूटही मिळू शकते. माहिमच्या कंदील गल्लीचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे दिवसभरात तुम्ही इथं कधीही जाऊन कंदील खरेदी करू शकता. तुम्हाला १०० पेक्षा जास्त आकाराचे, रंगाचे कंदील याठिकाणी मिळतील. त्यातून तुम्ही हटके आणि मनासारखा कंदील निवडू शकाल. माहिमच्या कंदील गल्लीत जाण्यासाठी माटुंगा रोड रेल्वे स्थानकावर उतरायचं. रेल्वे स्थानकाबाहेर येताच पश्चिमेकडे स्थानकापासून फक्त ५ ते ७ मिनिटांच्या अंतरावर ही कंदील गल्ली आहे. सिटीलाइट सिनेमा माहिम हे या ठिकाणाचं मुख्य लँडमार्क आहे.

# निवडणुकीचे काम करण्यास गैरहजर राहणाऱ्या शिक्षकांना हजर करण्याचे निर्देश

मिरा-भाईंदर/प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ च्या आदर्श आचार संहिता काळात निवडणुकीचे कामकाज करण्यास टाळाटाळ केलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना हजर करण्याचे निर्देश पोलिसांना देण्यात आले आहेत. मीरा -भाईंदर १४५ मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सुनील भूताळे यांनी भाईंदर, उत्तन सागरी, नवघर, नया नगर, मीरारोड आणि काशीमिरा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना निर्देश देत निवडणूक कार्यालय स्व. प्रमोद महाजन हॉल येथे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या समोर हजर करण्यास सांगितले आहे. यावरून शिक्षकांना कशाही परिस्थितीत पोलिसांना पकडून का होईना पण हजर करावे लागणार आहे. ठाणे जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडील १६ ऑक्टोबर रोजीच्या आदेशान्वये मीरा-भाईंदर मतदार संघात निवडणुकीचे काम करण्यासाठी विविध शाळेतील शिक्षकांच्या नियुक्तया करण्यात आलेल्या आहेत. तसेच निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्याकामी शालेय आस्थापना यांना कर्मचारी यांची निवडणूक कामी मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने प्रथम प्रशिक्षण हे २० ऑक्टोबर रोजी भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर नाटयगृह, मीरारोड येथे आयोजित करण्यात आलेले होते. त्यात सदर प्रशिक्षणाचे शालेय आस्थापना कर्मचारी यांना आदेश बजावण्यात आलेले होते. परंतु सदर कर्मचारी प्रशिक्षणास गैरहजर राहीले होते. त्या अनुषंगाने निवडणूक निर्णय अधिकारी यांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ निवडणुकीच्या कामात कर्मचारी अभावी व्यत्यय निर्माण होऊ नये, या करीता सदर शालेय आस्थापनांतर्गत निवडणूक कामकाजासाठी गैरहजर कर्मचार्यांना त्यांच्यासमक्ष २३ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते ५ वेळेत हजर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यात काशीमिरा येथील ९ शाळेतील १३२ शिक्षक नियुक्त होते. त्यात १२८ शिक्षक गैरहजर होते. नया नगर येथील २० शिक्षक नियुक्त सर्व गैरहजर होते. नवघर येथील ६३ शिक्षक नियुक्त आणि ६१ गैरहजर, उत्तन येथील ११ शिक्षक नियुक्त सर्व गैरहजर आणि भाईंदर येथील ३० शिक्षक त्यापैकी २९ गैरहजर आणि मीरारोड येथील ११२ शिक्षक नियुक्त १०० गैरहजर होते. असे एकूण ३६८ शिक्षकांच्या विविध शाळेतील नियुक्ती करण्यात आल्या होत्या. त्यातील ३४९ शिक्षक गैरहजर होते. त्यांना निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आपल्या पदाचा वापर करून सर्व पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना हजर करण्याचे आदेश दिले आहेत.

# कारवाई करुन जप्त केलेली वाहने घेऊन जाण्याचे विरार वाहतूक पोलिसांचे आवाहन

विरार/प्रतिनिधी

विरार शहरात वाहतुकीचे उल्लंघन करून तसेच वाहतुकीस अडथळा येईल अशा पद्धतीने उभ्या केलेल्या वाहनांवर वाहतूक पोलिसांकडून कारवाई केली जाते. तर काही वाहने जप्त केली जातात. मात्र जप्त केलेली वाहने सोडवण्यासाठी वाहन चालक मालकांकडून पाठ फिरवली असल्याचे दिसून आले आहे.

विरार वाहतूक परिमंडळ-३ यांच्या गोडाऊनमध्ये मागील एक वर्षापासून ते आतापर्यंत केलेल्या कायदेशीर कारवाईत वाहने धुळखात पडली आहेत. येत्या १५ दिवसांत वाहन मालक व चालक यांनी वाहतूक नियंत्रण शाखा- विरार, वाहतूक परिमंडळ-३ यांच्या कार्यालयात स्वतः येऊन कायदेशीर दंड भरून या वाहनांवरील प्रकरणाचा त्वरित निपटारा करावा तसेच वाहन विना दाव्याचे घोषित करून त्यांच्या वाहनांची कायदेशीर विल्हेवाट लावण्यात येईल याची नोंद घ्यावी असे आवाहन वाहतूक नियंत्रण शाखा विरारचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत लांगी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्राद्वारे केले आहे. यामध्ये ऑटोरिक्षा, बजाज एवेंजर, होंडा शाइन, स्प्लेंडर प्लस, पॅशन प्लस, पॅशन प्रो, स्प्लेंडर स्मार्ट, ऍक्टिवा, बजाज डिस्कवर, युनिकॉर्न, हिरो डीलक्स इत्यादी ६४ वाहनांचा यामध्ये समावेश आहे. २१ वाहनांच्या मालकांची नावे आणि पत्ते पोलिसांना सापडलेले नाहीत. यामध्ये तीन वाहनांना तर नंबर प्लेटच नाहीत, असे त्यांनी बोलताना सांगितले.

# बनावट कागदपत्रांद्वारे बँकखाते बनविणारी टोळी नवी मुंबई सायबर पोलिसांच्या जाळ्यात!

नवी मुंबई/प्रतिनिधी

न्हावाशेवा या परिसरातील एका व्यक्तीची साडेदहा लाख रुपयांची ऑनलाईन फसवणूकीच्या प्रकरणाचा तपास करताना नवी मुंबई पोलीसांच्या सायबर पथकातील ऑनलाईन फसवणूक करणा-या मोठ्या टोळीचा छडा लावला. वसई विरार परिसरातील एका गाळ्यातून ही टोळी सक्रिय होती. बनावट कागदपत्रांच्या साह्याने बँक खाती उघडून त्या माध्यमातून ऑनलाईन फसवणूकीची रक्कम काढण्यासाठी ही टोळी काम करत होती. २२ व ३४ वर्षीय वयाच्या तरुणांना पोलीसांनी अटक केली आहे. न्हावाशेवा येथे राहणाऱ्या व्यक्तीला समाजमाध्यमांवरील ‘टींडर’ ॲपवर ‘इमली’ नावाच्या महिलेने संपर्क साधला. चांगल्या परताव्याच्या गुंतवणुकीचे आमिष दाखवून पीडीत व्यक्तीच्या मोबाईलवरील व्हॉट्सॲवर इमली हीने www.flowertra.com ही लिंक पाठवली होती. या लिंकमध्ये पीडीत व्यक्तीला त्यांचे खाते उघडण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. पीडीत व्यक्तीची १० लाख ४० हजार २१२ रुपयांच्या रकमा वेगवेगळया बनावट बैंक खात्यामध्ये वळती करुन आर्थिक फसवणूक करण्यात आली होती. माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६६ (ड) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. नवी मुंबई सायबर विभागाच्या वरीष्ट पोलिस निरिक्षक दिपाली पाटील यांच्यासह सहाय्यक पोलिस निरिक्षक वृषाली पवार, महिला पोलीस हवालदार प्रगती म्हात्रे, पोलिस शिपाई अतुल मोहिते, पोलिस शिपाई विकी भोगम व पोलिस शिपाई समीर साळुंखे यांच्या पथकाने या प्रकरणाचा तपास करीत होते. ज्या बँक खात्यातून फसवणूकीची रक्कम वळती झाली त्या बँक खातेधारकांचा शोध घेत असताना पोलीसांना ‘वसई-विरार’ येथे बँक खाते उघडण्यासाठी बनावट दस्त बनविणारी टोळी सक्रिय असल्याचे समजले.






वसई रेल्वे स्थानकापासून हाकेच्या अंतरावर एका इमारतीमधील गाळ्यात काही तरुणमुले संशयास्पद रीत्या हालचाली असल्याची माहिती पोलीसांना मिळाल्यानंतर पोलीसांनी तेथे धाड घातली. त्यावेळेस तेथे ९ मुले सापडली. त्यांना ताब्यात घेतल्यावर त्यापैकी सुधीर जैन व संदेश जैन या संशयीत मुलांच्या बॅगमध्ये ५२ वेगवेगळया बँकांचे डेबिट कार्ड, १८ मोबाईल, १७ चेकबुक, १५ सिमकार्ड, ८ आधारकार्ड, ७ पॅनकार्ड, ३ वाहनचालक परवाना, २ मतदान ओळखपत्र, बनावट व्यवसाय व्हीजीटींग कार्ड अशी कागदपत्र सापडल्याने पोलीसही चक्रावले. अधिक चौकशीनंतर संदेश व सूधीर ही खोटी नावे असून यांची खरी नावे हिमांशु सेन आणि योगेश जैन असल्याचे पोलीसांना समजले. हिमांश व योगेश यांनी मुंबई व उपनगरातील इतर साथीदारांशी संगनमत करून ही टोळी चालवत होते. वसई, विरार, गोरेगांव व इतर ठिकाणी ही टोळी भाड्याने गाळे घेवुन तेथे उत्तरप्रदेश, राजस्थान अशा इतरत्र राज्यातील मुलांना कामाकरीता बोलावुन त्या मुलांच्या नावे वेगवेगळया बँकांचे खाते काढत असल्याचे उजेडात आले. भाडयाने घेतलेल्या गाळ्यावर वेगवेगळया मुलांच्या नावे वेगवेगळे बनावट भाडेकरार बनवुन आणि बनावट पोलीस चारीत्र्यपडताळणी प्रमाणपत्राची कागदपत्रे बनवुन वेगवेगळ्या बँकांमध्ये व्यवसायांचे चालू (करंट) खाते काढतात. बँक खाते सूरु झाल्यानंतर त्याचे सिमकार्ड व डेबिटकार्ड हे ट्रेनने उदयपुर, राजस्थान येथील त्यांच्या साथीदारांना पाठवतात. त्यानंतर या बँक खात्याचा वापर सायबर गुन्ह्यांसाठी केला जात असल्याची माहिती संशयीत फसवणूक करणाऱ्यांनी पोलीसांना दिली. या प्रकरणीत अटकेत असलेल्या दोघा संशय़ीतांना पोलीस कोठडी न्यायालयाने सूनावली आहे. पॅन कार्ड, आधारकार्ड, लिंक मोबाईल नंबर किंवा बँक खात्याची माहिती, प्रत कोणासही विनाकारण वापरण्याकरीता देवु नये. इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन फसवणूक करणारे गुन्हेगार फसवणुक रक्कम घेण्याकरीता बँक खात्यांचा वापर करु शकतील, असे नवी मुंबई पोलीस गुन्हे अन्वेषण विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांनी सांगितले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# भिवंडीत स्नेहा पाटील यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल!



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघात महायुतीमध्ये बिघाडी झाली असून भाजपा कडून बंडखोडी करीत भाजपा युवती मोर्चाच्या तालुकाध्यक्ष काल्हेर ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच स्नेहा देवेंद्र पाटील यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन करीत गुरुवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी संपूर्ण भिवंडी तालुका ग्रामीण मधील माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील समर्थक भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते मोठा संख्येने सहभागी झाले होते. या राजकीय घडामोडीनंतर आमदार शांताराम मोरे गटात खळबळ माजली आहे. भिवंडी ग्रामीणचे दहा वर्ष आमदार पद भूषवलेले शांताराम मोरे यांनी शिवसेनेतील भंडारी नंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत साथ दिली आहे.असे असतानाही महायुती कडून अजूनही त्यांच्या नावाची घोषणा होत नाही.याच दरम्यान भाजपाच्या युवती मोर्चाच्या तालुकाध्यक्ष असलेल्या स्नेहा देवेंद्र पाटील यांनी गुरुवारी जोरदार शक्तिप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज भरला. यावेळी त्यांच्या सोबत तालुक्यातील भाजपाचे जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य सरपंच व भाजपा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामुळे भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदार संघात महायुती मध्ये बंडखोरी आता अटळ झाली असून या बंडाळीचा फटका नक्की कोणाला बसतो हे येणारा काळच ठरवणार आहे. अशिक्षित आमदार असल्यामुळे विधानसभेत भिवंडी ग्रामीण भागातील प्रश्न त्यांच्याकडून मांडले गेले नाहीत आणि त्यामुळे या भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील विकास मागील १० वर्षापासून खुंटला असेल फक्त पाणी आणि रस्ते हे प्रश्नच महत्वाचे नसून या भिवंडी आणि वाडा या भागातील आदिवासी पाड्यावत्यांवरील महिलांचे प्रश्न सुद्धा अत्यंत गंभीर आहेत त्यांना मी नक्कीच वाचा पडेल व त्यामुळे संपूर्ण मतदारसंघातील हितचिंतक समर्थक यांचं जोरदार समर्थक माझ्यासोबत असल्यामुळे विजय माझा नक्कीच होईल असा विश्वास अपक्ष उमेदवार स्नेहा देवेंद्र पाटील यांनी व्यक्त केला आहे.

# विकासाचे शिलेदार होण्यासाठी आगामी २५ दिवस द्या; आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांचे बुथप्रमुखांना आवाहन

**शिरूर अनंतपाळ/प्रतिनिधी**

निलंगा विधानसभे अंतर्गत शिरूर अनंतपाळ तालुक्यात सर्वाधिक विकास कामे झाली आहेत. विकासाची ही गती कायम राखत प्रगती करण्याची संधी पुन्हा एकदा चालून आली आहे. या विकासाचे शिलेदार होण्यासाठी सर्व बुथप्रमुखांनी आगामी २५ दिवसांचा कालावधी पक्षासाठी द्यावा, असे आवाहन माजीमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शिरूर अनंतपाळ येथील पांढरवाडी मोड परिसरातील साई मंगल कार्यालयात साकोळ जिल्हा परिषद गटाचा आणि शहरातील अनंतपाळ मंगल कार्यालयात शिरूर अनंतपाळ शहरातील बुथ प्रमुखांचा विजय संकल्प बुथप्रमुख मेळावा संपन्न झाला. यावेळी बुथप्रमुखांना मार्गदर्शन करताना आ. निलंगेकर बोलत होते. साकोळ गटाच्या मेळाव्यास भाजपाचे प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर, तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे, जिपचे माजी सभापती गोविंद चिलकुरे, ऋषिकेश बद्दे, अनिल शिंदे, माजी उपसभापती भिक्काताई, निवृत्त मुख्याध्यापक बालाजी जाधव, ॲड. ज्ञानेश्वर चेवले, शेषराव ममाळे यांची उपस्थिती होती. शिरूर अनंतपाळ शहराच्या मेळाव्यास या मान्यवरांसह ज्येष्ठ कार्यकर्ते व्यंकटेश देवशेटवार, अप्पाराव नाटकरे, शंकर बेंबळगे, शहराध्यक्ष संतोष शेटे, नगराध्यक्षा मायावती धुमाळे, माजी सभापती धोंडीराम सांगवे, गणेश सलगरे, गणेश धुमाळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना आ.निलंगेकर म्हणाले की, शिरूर अनंतपाळ शहर आणि तालुक्यावर माझे विशेष प्रेम आहे. तालुक्याच्या विकासासाठी आतापर्यंत मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असून या माध्यमातून तालुक्याचा कायापालट झाला आहे. तालुक्यातून राष्ट्रीय महामार्ग गेले आहेत. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांना मिळवून दिला आहे. हक्काच्या पाण्यासाठी पाठपुरावा केला आहे. शिरूर अनंतपाळ तालुक्यातून रेल्वे जावी यासाठी पाठपुरावा सुरू आहे. वेगवेगळ्या माध्यमातून तालुक्याच्या विकासाला गती मिळवून देण्याचे काम आपण केले आहे. भविष्यासाठीही आराखडा तयार केला आहे. विकासाचे हे व्हिजन प्रत्यक्षात उतरवण्यासाठी बुथ प्रमुखांनी आगामी २५ दिवस झोकून देऊन काम करावे, असे ते म्हणाले. आ.निलंगेकर यांनी सांगितले की, विरोधकांकडे विकासाची दृष्टी नाही. सांगण्यासारखे त्यांच्याकडे काहीच नाही. केवळ अपप्रचार सुरू आहे. त्याला उत्तर देण्याची जबाबदारी तुम्हा-आम्हा सर्वांची आहे. केवळ खोटी बतावणी करून मतदारांची दिशाभूल करण्याचे काम विरोधक करत आहेत. या निवडणुकीच्या माध्यमातून स्वहितासाठी राजकारण करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवून द्या, असे आवाहनही आ. निलंगेकर यांनी याप्रसंगी बोलताना केले. याप्रसंगी अरविंद पाटील निलंगेकर, गोविंद चिलकुरे, ऋषिकेश बद्दे, संतोष शेटे, धोंडीराम सांगवे, संजय दोरवे यांचीही भाषणे झाली. या दोन्ही मेळाव्यांना बूथप्रमुखांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील ४0हून अधिक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या होणार बदल्या!

**निवडणूक आयोगाच्या परिपत्रकाचा २५०० पोलिसांना बसला फटका**

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**




विधानसभा निवडणुकीसंदर्भात निवडणूक आयोगाने जारी केलेल्या परिपत्रकामुळे मीरा भाईंदर वसई विरार आयुक्तालयातील ४0हून अधिक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना फटका बसणार आहे. एका आयुक्तालयात दोन जिल्हे असल्यास तीन वर्षे पूर्ण झालेल्या पोलिस अधिकाऱ्यांची जिल्ह्याबाहेर बदली करण्याचे निर्देश पोलिस महासंचालकांना देण्यात आले आहेत. मात्र लोकसभा निवडणुकीपूर्वी बदल्या झालेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांमुळे पोलीस दलात अधिक नाराजी आहे. विशेष म्हणजे विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने नवे परिपत्रक जारी केले आहे. आयुक्तालयात दोन जिल्हे असणार असून गेल्या ४ वर्षांत ३ वर्षे सेवा बजावलेल्या पोलिसांची आयुक्तालयाबाहेर बदली करण्याचे आदेश पोलिस महासंचालकांना देण्यात आले आहेत. या आदेशामुळे मुंबई, नवी मुंबई आणि मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील २५00 पोलिसांना या निर्णयाचा फटका बसणार आहे. मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयात ठाणे आणि पालघर या दोन जिल्ह्यांचा समावेश होतो. त्यामुळे या आयुक्तालयातील सुमारे ४0 पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या होणार आहेत. दिवाळीला बदली होणार असल्याने या निर्णयामुळे पोलिस अधिकाऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी एमबीव्हीव्ही आयुक्तालयाने पहिले परिपत्रक जारी केले. पोलिस आयुक्तालयात एकापेक्षा जास्त जिल्हे असल्यास पात्र अधिकाऱ्यांना शक्य असल्यास अन्य जिल्ह्यात सामावून घ्यावे. त्यामुळे मीरा भाईंदर वसई विरार आयुक्तालयात पालघर आणि ठाणे असे दोन जिल्हे आहेत. या आदेशामुळे १९ पोलिसांची आयुक्तालयातच बदली करण्यात आली. आता त्या पोलिस कर्मचाऱ्यांना कायम करण्यात येत असून निवडणूक आयोगाच्या नव्या परिपत्रकामुळे एकूण ४0 पोलिसांवर परिणाम होणार असून त्यांची बदली होणार आहे. वसई विरार मीरा भाईंदर आयुक्तालयात आम्हाला ६ वर्षे पूर्ण झालेली नाहीत. आम्ही काही महिन्यांपूर्वीच पदभार स्वीकारला आहे. एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. आम्ही आमच्या भागात घरे घेऊन मुलांना शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश दिला आहे. मात्र बदलीमुळे मुलांच्या शिक्षणात सर्वकाही विस्कळीत होणार आहे. निवडणूक आयोगाचा हा निर्णय मनमानी आहे. हे महसूल आणि महापालिका अधिकाऱ्यांना लागू नाही. केवळ पोलिसांनाच का टार्गेट केले जाते, असा प्रश्न अनेक पोलिस अधिकाऱ्यांना पडला.

# महेश चौगुले भिवंडीतून हॅट्रिक करणार -विनोद तावडे




**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी लोकसभा मतदारसंघात झालेल्या पराभवाचा बदला घेण्याची वेळ आली आहे. या मतदारसंघात सर्व कार्यकर्त्यांनी झोकून देऊन काम केले तर यश नक्कीच मिळेल आणि महेश चौगुले यांना हॅट्रिक करण्याची संधी लाभेल असे वक्तव्य भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय चर्चेत विनोद तावडे यांनी केले आहे. ते भिवंडी पश्चिमचे भाजपा उमेदवार महेश चौगुले यांच्या निवडणूक प्रचार कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. या प्रसंगी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, भाजपा निरीक्षक खासदार कविता पाटीदार, भाजपा शहराध्यक्ष अँड.हर्षल पाटील, महायुतीतील शिवसेना शहराध्यक्ष सुभाष माने, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील शहराध्यक्ष प्रवीण पाटील यांसह महायुतीतील प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विजय संपादन करण्यासाठी कार्यकर्त्यांनी कार्यालयात बसून न राहता जनतेमध्ये जाऊन केंद्र व राज्य सरकारने राबवलेल्या कल्याणकारी योजना माहिती देत असताना याचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना भेटून त्यांना मतदान करण्यासाठी प्रवृत्त करणे गरजेचे आहे असे सांगत असतानाच नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वा खाली दहा वर्षात एकही भ्रष्टाचाराचा आरोप झाला नाही. पण जर लाडकी बहीण योजना काँग्रेस काळात सुरू झाली असती तर जनते पर्यत पैसे पोहोचल्या नसते असा आरोप विनोद तावडे यांनी केला.

# प्रचंड शक्तीप्रदर्शन करत अभिमन्यू पवारांनी भरला उमेदवारी अर्ज

**औसा/ शिवाजी मोरे**



औसा विधानसभा मतदार संघात भाजपाचे अभिमन्यू पवारांनी आपला उमेदवारी अर्ज विराट जनसमुदायाच्या उपस्थितीत शंखनाद रॅलीद्वारे शुक्रवारी (ता.२५) दाखल केला. यावेळी त्यांच्या सोबत राज्य कृषीमुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, सेनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी माने, राष्ट्रवादी काँग्रेसचे दत्तात्रय कोळपे, रिपाईचे समाधान वाघमारे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख तानाजी सुरवसे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रदीप मोरे, शिवसेनेचे शहरप्रमुख बंडू कोद्रे यांच्यासह भाजपाचे आनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

औसा विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाकडून आमदार अभिमन्यू पवार हे निवडणुक लढवित आहेत. त्यांचा उमेदवारी अर्ज शुक्रवारी विराट रॅलिद्वारे दाखल करण्यात आला. शहरातील छत्रपती संभाजी नगर येथुन रॅलिला सुरुवात झाली. यावेळी मतदारसंघातील हजारो लोकांची उपस्थिती होती. ही रॅली गांधी चौक, हनुमान मंदीर, जुने बस्थानक या मार्गावरुन तहसील कार्यालया समोर आली. उमेदवारी अर्ज भरण्याच्या आगोदर कृषीमुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी आमदार म्हणुन अभिमन्यू पवारांनी सर्वबाजुंनी चांगले काम केले आहे. विकासाचे एक वेगळे पर्व मतदारसंघात सुरु झाल्याने याला खंड न देता तो पुढे सुरु राहण्यासाठी अभिमन्यू पवारांना साथ देण्याचे अवाहन त्यांनी केले. यावेळी झालेल्या भाषणात आमदार अभिमन्यू पवारांनी सांगीतले की, मतदारसंघाच्या विकासासाठी व प्रत्येक जातीधर्मासाठी मी चांगले काम केले. मतदारसंघात तीन हजार कोटी रुपयांचा निधी आणला. औसा शहरासाठी पाचशे कोटी रुपये आणुन शहरासह मतदारसंघाचा कायापालट करण्याचा प्रयत्न केला. मी माझे काम केले आहे. आता तुमची वेळ आली आहे मला साथ देण्याची. औशाला नंबर एक बनवायचे असेल तर मला साथ द्या. असे अवाहन त्यांनी उपस्थितांना यावेळी केले. त्यानंतर मित्रपक्षाच्या पदाधिकाऱ्यांसोबत जात त्यांनी निवडणुक विभागात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

# निवडणुकीसाठी लागणाऱ्या प्रचार साहित्याच्या दरात वाढ

**ठाणे/प्रतिनिधी**




महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये उमेद्वारांच्या अर्जाच्या नावांची घोषणा होण्याआधीच प्रचार साहित्य खरेदीची लगबग सुरू झाली आहे. यंदा या प्रचार साहित्यांमध्ये १५ ते २0 टक्क्यांनी वाढ झाली आहे. विधानसभा निवडणुकांमुळे सर्वत्र राजकीय मंडळी आणि कार्यकर्ते पक्षाच्या कामाला लागले आहेत. उमेदवाराचा प्रचार करत असताना सभा किंवा नागरिकांच्या भेटीगाठी घेताना आपल्या पक्षाचे चिन्ह उमेदवाराचा फोटो असलेले फलक, झेंडे, आणि स्कार्फ यांचा जास्तीत जास्त वापर केला जातो. प्रचाराच्या वातावरणनिर्मितीसाठी सध्या विविध पक्षांकडून प्रयत्न सुरू आहेत. सभा आणि राजकीय कार्यक्रमांसाठी प्रचार साहित्याची गरज राजकीय पक्षांना भासते. त्यासाठी काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी, शिवसेनेचे दोन्ही गट या प्रमुख राजकीय पक्षासह अपक्ष तसेच इतर पक्षांचे नाव, नेत्यांची नावे असलेले प्रचार साहित्य दाखल झाले आहे. त्यात झेंडे, धातूचे बिल्ले, प्लास्टिक बिल्ले, टोपी, रुमाल, फिती इत्यादींचा समावेश आहे. यंदा दिवाळी आणि निवडणुक एकावेळी आल्याने प्रचार साहित्यांच्या दरात १५ ते २0 टक्क्यांनी वाढ झाली आहे. तर यंदा प्रचार साहित्यामध्ये चष्मा हा नव्याने तयार करण्यात आला आहे. यावर सर्व पक्षाचे चिन्ह छापण्यात आले आहेत. प्रचार साहित्य तयार करण्यासाठी एक महिना आधीपासून तयारी करण्यात आली आहे. त्याचबरोबर या साहित्यांमध्ये स्वतंत्र पक्षाचे साहित्य अधिक तयार केले जाते. तसेच इतर पक्षाचे मागणीनुसार साहित्य तयार केले जाते, असे विक्रेत्यांनी सांगितले. ठाणे शहरात सर्व उमेद्वारांच्या अर्जाच्या नावांची घोषणा होण्याआधीच उमेद्वार पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून ५0 टक्क्यांहून अधिक प्रचार साहित्यांसाठी दुकानांमध्ये मागणी आल्या आहेत. शहरात अहमदाबाद, दिल्ली व सुरत या ठिकाणाहून प्रचार साहित्यासाठी लागणारा कच्चा माल दाखल होत आहे. तर ठाणे शहरातून जालना, औरंगाबाद, अहमदाबाद, पिंपरी-चिंचवड, शिर्डी, संगमनेर, झारखंड या ठिकाणी प्रचार साहित्य पोहचले आहे. त्याचप्रमाणे यंदा पाच ते साडे सात फुटांपर्यंत झेंडे तयार करण्यात आले आहेत. तसेच १00 मिटरचे पक्ष चिन्ह असलेले पट्टे तयार करण्यात आले आहेत. यामध्ये देखील १0 ते १२ टक्क्यांनी वाढ झाली आहे, असे विक्रेते अरविंद साबू यांनी सांगितले.

# अल्पवयीन मुलीच्या तस्करीप्रकरणी दलालासह आईला ठोकल्या बेड्या!

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

काशीमिरा येथे एका आईने आपल्या पोटाच्या १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचा दलाल महिले मार्फत कौमार्यभंगाचा दोन लाखात सौदा केल्याचे समोर आले आहे. कौमार्यभंग करणाऱ्या आई आणि दलाल महिलेवर सापळा रचून मीरा- भाईंदर अनैतिक मानवी वाहतूक शाखेने छापा टाकत त्या आईवर आणि दलाल महिलेवर कारवाई करत त्यांच्या मुसक्या आवळल्या आहेत. तसेच पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करत कारवाई करून अल्पवयीन मुलीची सुटका करण्यात आली आहे. ही कारवाई अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक समीर अहिरराव यांनी आणि त्यांच्या पथकाने केली आहे. काशीमिरा पोलीस ठाणे हद्दीत हटकेश येथील शाही फॅमिली रेस्टॉरंट येथे २२ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेतीन या ठिकाणी महिला वेश्यादलाल शबीनाझ साजीद सय्येद आणि १३ वर्षीय पीडित मुलीची आई हिने आपापसात संगनमत करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी १३ वर्षे, २ महिने वय असलेल्या पोटच्या अल्पवयीन मुलीचा कौमार्यभंग करण्याच्या बोलीवर रक्कम ठरवली होती. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील अल्पवयीन मुलीला कांदिवलीच्या रेस्क्यू फाऊंडेशन येथे दाखल करून मुलीची वैद्यकीय तपासणी सुरू आहे.

# अश्लिल क्लिपच्या आधारे वृद्धाकडून उकळले ३४ लाख रुपये!

**एका तरूणीसह तिघांविरोधात आचोळे पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल**

**नालासोपारा/प्रतिनिधी**




एका वृध्दाला मधुजालात अडकून अश्लील चित्रफितीच्या आधारे त्याच्याकडून तब्बल ३४ लाख रुपये उकळल्याचा प्रकार नालासोपारा येथे उघडकीस आला आहे. याप्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात एका तरूणीसह तिघांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नालासोपाऱ्याच्या आचोळे परिसरात राहणारे तक्रारदार हे ६९ वर्षांचे असून सेवानिवृत्त आहेत. २८ एप्रिल रोजी त्यांना 'कुटुंब' नावाच्या पवरून प्रियांका शर्मा नावाच्या तरुणीने संपर्क साधला होता. प्रियांकाने तक्रारदाराला मधाळ बोलण्यात गुंतवून मधुजालात (हनीट्रॅप) मध्ये अडकवले. तिने स्वतःचा न्यूड व्हिडियो पाठवला आणि तक्रारदाराला देखील आपला न्यूड व्हिडियो पाठविण्यास सांगितले. तिच्या जाळ्यात फसून तक्रारदाराने त्या तरुणीला आपला न्यूड व्हिडियो पाठवला होता. यानंतर मात्र प्रियांकाने तक्रारदाला ब्लॅकमेल करण्यास सुरवात केली. न्यूड व्हिडियो डिलिट करायचा असेल तर पैसे द्यावे लागतील असे तिने सांगितले. घाबरून त्यांनी प्रियांकाचा नंबर डिलीट करून तिला ब्लॉक केले. प्रियांकाचा नंबर ब्लॉक केल्याने हे प्रकरण शांत झाले असे तक्रारदाराला वाटले. मात्र लगेच त्यांना रामकुमार मल्होत्रा नावाच्या इसमाचा फोन आला. दिल्ली गुन्हे शाखेतून बोलत असल्याचे त्याने सांगून हे प्रकरण मिटविण्यासाठी पैशांची मागणी केली. एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत त्यांनी तक्रारदाराकडून ३४ लाख रुपये उकळले. हे पैसे तक्रारदाराने ऑनलाईन आणि आरटीजीएस द्वारे पाठवलेहोते. मात्र तरी देखील या भामट्यांची पैशांची मागणी वाढत होती. अखेर तक्रारदाराने आचोळे पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. एप्रिल पासून हा फसवणुकीचा प्रकार सुरू होता. याप्रकरणी आम्ही प्रियांका शर्मा, रामकुमार मल्होत्रा आणि राहुल शर्मा नावाच्या तीन जणांविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४) ३ (५) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कलम ६६ (सी)(डी) ६७अन्वये गुन्हे दाखल केल्याचे माहिती आचोळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी दिली.

# अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार; दोघांवर गुन्हा दाखल

**नालासोपारा/प्रतिनिधी**

नालासोपाऱ्यात आणखी एक सामूहिक बलात्काराची घटना उघडकीस आली आहे. १६ वर्षाच्या मुलीवर तिच्या वर्गमित्रासह दोघांना धमकावून बलात्कार केला तसेच तिची अश्लील छायाचित्रे काढून तिला धमकावले आहे. याप्रकरणी नालासोपारा पोलिसांनी दोन विधीसंघर्षित (अल्पवयीन) मुलांवर सामूहिक बलात्कार आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियमाअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पीडित मुलगी १६ वर्षांची आहे. ऑगस्ट महिन्यात तिचा १६ वर्षांचा वर्ग मित्र तिला निळेमोरे येथील एका मित्राच्या घरी घेऊन गेला होता. तेथे तिला फूस लावून त्या दोघांनी तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर दोघांनी पुन्हा तिला धमकावून निळेमोरे येथे बोलावून तिच्यावर बलात्कार केला. यावेळी एका आरोपीने त्यांच्या संबंधाचे चित्रिकरण केले. या चित्रिकरणाच्या आधारे दोन्ही तिला धमकावत होते. याप्रकरणी पिडीत मुलीच्या आईने नालासोपारा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. यातील एक आरोपी १६ तर दुसरा आरोपी १७ वर्षांचा आहे. त्यांच्या विरोधात नालासोपारा पोलिसांनी सामूहिक बलात्कार आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियमाअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या नराधमांना कठोर शिक्षा झाली पाहिजे असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.

28 OCTOBER TO 03 NOVEMBER 2024 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 10/26/2024 10:28 PM Page 1



# टेम्पोच्या धडकेत विद्यार्थ्याचा मृत्यू, एक जखमी

**डोंबिवली/प्रतिनिधी**

डोंबिवली येथील एमआयडीसी मधील कावेरी चौकात बुधवारी संध्याकाळी मद्य सेवन करून टेम्पो चालविणाऱ्या एका चालकाने दुचाकीवरून जाणाऱ्या एका दुचाकीला जोराची धडक दिली. या धडकेत दुचाकीवरील एका विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू झाला आहे. दुसरा विद्यार्थी गंभीर जखमी झाला आहे. बुध्दशल खंडारे (१६, रा. सोनारपाडा) मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. वैभव शेंडगे (१६) जखमी विद्यार्थ्याचे नाव आहे. मद्य सेवन करून टेम्पो चालविणाऱ्या चालकाला नागरिकांकडून पकडून बेदम चोप दिला आणि त्यानंतर मानपाडा पोलिसांच्या स्वाधीन केले. बुध्दशल खंडारे डोंबिवली एमआयडीसीतील एका शाळेचा विद्यार्थी होता. तो इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेत होता. अभ्यासात हुषार होता, असे त्याच्या शिक्षकांनी सांगितले. बुध्दशल आणि वैभव यांच्या परीक्षा सुरू आहेत. बुध्दशल आणि वैभव दोघे संध्याकाळी खासगी शिकवणीला गेले होते. दुचाकीवरून ते एमआयडीसीतील कावेरी चौकातून जात घरी परतत होते. यावेळी फेरीवाले, पादचाऱ्यांनी गजबजलेल्या कावेरी चौकातून एक टेम्पो चालक भरधाव वेगाने टेम्पो चालवत होता. या टेम्पो चालकाने मद्य सेवन केले होते. कावेरी चौकात आल्यावर चालकाचे टेम्पोवरील नियंत्रण सुटले. त्याने बुध्दशल खंडारे, वैभव बसलेल्या दुचाकीला जोराची धडक दिली. या धडकेत बुध्दशल टेम्पोची जोराची धडक बसल्याने जागीच ठार झाला. वैभव टेम्पोच्या धडकेत दूर फेकला गेल्याने तो थोडक्यात बचावला. त्याला गंभीर जखमा झाल्या आहेत. अपघात होताच नागरिकांनी तात्काळ मानपाडा पोलिसांना कळविले आणि मद्याच्या धुंदीत असलेल्या टेम्पो चालकाला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. यासंदर्भात मानपाडा पोलीस ठाण्याचे साहाय्यक पोलीस निरीक्षक गोरे यांनी सांगितले.

# प्रवीण धुळे खून प्रकरणातील फरार आरोपी अखेर पोलीस कोठडीत!

**नालासोपारा/प्रतिनिधी**

जानेवारी २००९ च्या खळबळजनक प्रवीण प्रभाकर धुळे खून प्रकरणातील वाँटेड गुन्हेगार झुरी उर्फ विनोद सिंग हा तब्बल १६ वर्षांपासून पोलिसांना चकमा देत होता, याप्रकरणी परिमंडळ २ गुन्हे शाखेचे स्टेशन प्रभारी राहुल राख यांच्या नेतृत्वाखाली पोलीस दलाने सापळा रचून गुन्हेगाराला उत्तर प्रदेशातील भदोही येथून अटक केली. या खून प्रकरणातील आरोपी झुरी उर्फ विनोद सिंग याला त्याच्या मूळ गावी भदोही येथून अटक करून प्रथम स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आले, तेथे कायदेशीर कार्यवाही पूर्ण केल्यानंतर न्यायालयाने त्याला महाराष्ट्र पालघर पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे, सहायक आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे स्टेशन प्रभारी प्रमोद राख व त्यांच्या पथकाने दोन महिन्यांच्या अथक परिश्रमानंतर तांत्रिक विश्लेषण आणि मुखबिर च्या सहाय्याने गुन्ह्यात सहभागी असलेल्या वाँटेड गुन्हेगाराला पकडण्यात यश मिळविल.

# वाडा तालुका सरपंच परिषदेच्या अध्यक्ष पदी अवनी सांबरे



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुका सरपंच परिषदेच्या झालेल्या मीटिंग मध्ये हमरापुर ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच अवनी अजय सांबरे यांची सरपंच परिषदेच्या अध्यक्ष पदी एकमताने निवड करण्यात आली. त्या सरपंच परिषदेच्या तिसऱ्या अध्यक्ष म्हणून काम पाहणार आहेत. यावेळी तालुक्यातील बहुसंख्य सरपंच उपस्थित होते. तालुक्यामध्ये पन्नास टक्के महिला सरपंच आहेत त्यामुळे महिलांना प्रतिनिधित्वाची संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने अवनी सांबरे यांची निवड करण्यात आली असल्याचे सरपंच परिषदेचे प्रवक्ता तथा सल्लागार भरत हजारे यांनी माहिती दिली. यावेळी दिनेश कोदे व पुष्पा चातुर्य यांची परिषदेच्या उपाध्यक्ष पदी तर लहू धींडे यांची सचिव पदी, प्राजक्ता शिंगा यांची सहसचिव पदी, वेदिका गवा यांची खजिनदार पदी निवड करण्यात आली. यावेळी उपस्थित सरपंचानकडून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# बोईसर येथे ७० फूट खोल दगड खाणीत पडून ठेकेदाराचा दुदैवी मृत्यू

**बोईसर/प्रतिनिधी**



बोईसर पूर्वेकडील मनोर पोलीस ठाणे हद्दीतील दगड खाणी असलेल्या नागझरी ग्रामपंचायत हद्दीतील एका ७० फूट खोल दगडखाणीत पडून ठेकेदाराचा मृत्यू झाला आहे. घटना मंगळवारी सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. जयेश मोहन काकड (वय.३२, रा.नागझरी) असे मयत ठेकेदाराचे नाव आहे. एक वर्षापूर्वीच त्याचे लग्न झाले होते.तो नागझरी ग्रामपंचायतचा विद्यमान सदस्य देखील होता. मंगळवारी नेहमीप्रमाणे तो खदानीच्या वरच्या भागात मातीचा ढीग काढण्याचे काम करत होता. दरम्यान त्याचा तोल जाऊन तो ७० ते ८० फुट उंचावरून दगड खाणीत कोसळून गंभीर जखमी झाला होता. त्याला खाजगी रुग्णालयात उपचारासाठी नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मृतदेह शवविच्छेदनासाठी मनोरच्या ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. याप्रकरणी मनोर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दरम्यान दगडखाण मालक अथवा चालकाकडून कामगारांना सुरक्षेची साधने पुरवली जात नसल्याने कामगारांनी संताप व्यक्त केला आहे.

# वॉरंट बनवताना छातीत कळ, पोलीस कर्मचाऱ्याला ऑन ड्युटी हार्ट अटॅक!

**रायगड/प्रतिनिधी**

महाड तालुका पोलीस ठाणे येथे कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली आहे. आज सकाळी साडे नऊ वाजताच्या सुमारास हृदयविकाराचा झटका येऊन सागर गायकवाड या पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील हा प्रकार घडला आहे. सागर गायकवाड हे पोलीस हवालदार या हुद्द्यावर कार्यरत होते. आपली ड्युटी बजावत असतानाच त्यांना हृदयविकाराचा झटका आला. गायकवाड हे वॉरंट बनवण्याचे काम करत होते. अचानक त्यांच्या छातीमध्ये दुखायला सुरुवात झाली आणि त्यांना हृदयविकाराचा झटका आला. प्रथम सागर गायकवाड यांना महाड येथील देशमुख यांच्या खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरु असतानाच त्यांचं निधन झालं. गायकवाड यांनी यापूर्वी महाड शहर पोलीस ठाणे, म्हसळा पोलीस ठाणे, पोलादपूर पोलीस ठाणे, रायगड जिल्हा अधीक्षक कार्यालय, वाहतूक पोलीस महाड अशा अनेक ठिकाणी पोलीस खात्यामध्ये नोकरी केली होती. सागर गायकवाड यांच्या अचानक जाण्याने पोलीस प्रशासन विभागावर शोककळा पसरली आहे. सागर गायकवाड यांच्या पाश्चात त्यांची पत्नी, महिला पोलीस हवालदार नीलिमा गायकवाड व एक मुलगी, मुलगा असा परिवार आहे. सागर गायकवाड हे मूळचे सातारा जिल्ह्यातील असून रायगड जिल्हा पोलीस दलामध्ये अतिशय प्रामाणिकपणे आपले काम केले होते.

पान १ वरून....

## मोबाईल चोरीच्या संशयातून ठार..

समोर आली. या घटनेची माहिती मिळताच शांतीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड पोलिस निरीक्षक विनोद पाटील,अतुल अडुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस घटनास्थळी दाखल होत त्यांनी मयत व्यक्तीच्या सोबत त्याची ओळख पटवून देणारी कोणतीही माहिती नसताना परिसरात माहिती घेत त्यांच्या नातेवाईकांचा शोध घेतला.त्यानंतर त्याचं नाव मोहम्मद रहमत शहा आलम वय २० वर्षे रा.कलकत्ता पश्चिम बंगाल असल्याचे निष्पन्न झाले.ही माहिती तपासात समोर आल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे व सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखालील पोलिस कर्मचारी रिजवान सैय्यद, काळूराम शिरोसे, संतोष पवार, किरण जाधव, दिनेश भुरकुट, श्रीकांत पाटील, दीपक सानप, प्रशांत बर्वे, मनोज मुके, रोशन जाधव, रवींद्र पाटील या पोलीस पथकाने गुप्त बातमीदार मार्फत व मोबाईलच्या तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे माहिती मिळवून अरमान अन्सारी या मुख्य आरोपी सोबत त्याचे पाच ते सात आरोपी यांना ताब्यात घेतले. त्यांच्या कडे कसून चौकशी केल्या नंतर मोबाईल चोरीच्या संशयावरून लाकडी मारदांड्याने त्यास बेदम मारहाण करून जीवे ठार मारले असल्याचे निष्पन्न झाले. गुन्हा समजल्या नंतर अवघ्या तीन तासात पोलिसांनी या हत्या करणाऱ्यांना बेड्या ठोकण्यात यश मिळवले आहे.यातील अजून काही आरोपी असून त्यांना पकडण्यासाठी उत्तर प्रदेश येथे पोलिस पथक रवाना केले आहेत अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी शेवटी दिली आहे.

## पैशासाठी नाते संपवून टाकले...

हे लोक पत्नीचा पैशासाठी छळ करतात, काही वेळा जीवही घेतात. याचेच दुर्दैवी उदाहरण नाशिक जिल्ह्यात दिसून आले. नवीन शेती खरेदी करण्यासाठी माहेरून पैसे आणले नाहीत या कारणावरून बागलाण तालुक्यातील खिरमाणी गावामध्ये पत्नीला स्वतःच्या विहीरीत ढकलून दिले. हा सगळा प्रकार तिच्या भावासमोर झाल्याने तोही हादरून गेला आहे. सटाणा तालुक्यातील फोपीर 'या छोट्या गावात विलास मोठा भाऊ पवार (वय ३६) हा तरूण रहातो. तो त्याचे वडील, मोठा भाऊ महादू पवार, आई सखूबाई, मोठा भाऊ पवार, भाऊ हेमंत मोठा भाऊ पवार, वहिनी कल्याणी हेमंत पवार, मुले, पुतणे अशा एकत्रित कुटुंबात रहातात. हा परिवार शेतकरी असून विलास हाही शेतीच करतो. विलासची लहान बहीण योगिता उर्फ अंजनाबाई हिचा विवाह सन २००८ साली खिरमाणी, ता. सटाणा येथील देविदास महादू भदाणे याच्यासोबत झाला होता. तिला एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये झाली. देविदास याने केलेल्या कर्जामुळे योगिता आणि देविदास या दोघांमध्ये नेहमी भांडणे व्हायची, त्यामुळे कर्जाला कंटाळून देविदास याने सहा महिन्यापूर्वी त्यांची वडीलोपार्जीत शेती विकली. त्यातून आलेल्या पैशांमधून त्याने कर्जाची फेड केली. त्यानंतर देविदासला नवीन शेती घ्यावयाची असल्याने तो आता योगिताला माहेरहून पैसे आणण्यासाठी तगादा लावू लागला होता. तो, त्याच्यासह तिचे सासरे महादू दगा भदाणे, सासू सगुणाबाई महादू भदाने, जेठ प्रविण महादू भदाणे, पूनम प्रविण भदाणे आदीजण तिला नवीन शेती घेण्यासाठी माहेरून पैसे घेवून ये अशी मागणी करू लागले. त्यासाठी सर्वजण तिला त्रास देवू लागले. तिला होणारा त्रास पाहून भाऊ विलासने उसनवारी करून तसेच काही पैसे जमवून पाच लाख रूपये देविदासला नवीन शेती घेण्यासाठी दिले. पाच लाख दिल्यावरही ते आणखी पैशांची मागणी योगिताकडे करू लागले आणि त्यासाठी सर्व जण तिला त्रास देवून तिला छळू लागले. दि.१३ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजण्याच्या दरम्यान बहीण योगिता उर्फ अंजनाबाई हिच्या नवीन शेतात विहीर खोदण्यात आली होती. त्या विहीरीवर मोटर टाकण्यासाठी तिचा भाऊ विलास हा त्यांच्याकडे आलेला होता. या शेतात विलास, त्याची बहीण योगिता, तिचा पती असे सर्व जण नवीन शेतात वायर वगैरे घेवून आले. त्यानंतर देविदासचे वडील महादू भदाणे, दीर प्रविण भदाणे, जाऊ पूनम भदाणे, सासू सगुणाबाई भदाणे, जिजाबाई भदाणे असे सर्व जण त्या शेतात आले. त्यानंतर विलास बहीणीच्या शेतातील कांद्याची रोपे पहाण्यासाठी गेला. तो कांद्याचे रोप पहात असतांना योगिता उर्फ अंजनाबाई व इतरांचा मोठमोठ्याने वाद सुरू असल्याचे विलासला दिसले. देविदास व इतर तिच्याशी वाद घालून जोरजोरात भांडण करत होते. त्या भांडणाचा आवाज ऐकून विलास ताबडतोब त्यांच्याकडे येत होता, तेंव्हा देविदासने पत्नी योगिता हिचे दोन्ही हात धरले आणि शेतातील विहीरीजवळ तिला घेवून गेला. काही कळायच्या आत त्याने तिला धक्का मारून विहीरीत ढकलून दिले. हे पाहून विलासला रडू कोसळले. तो मोठमोठ्याने रडत विहीरीजवळ आला. विहीरीत डोकावून तो बहीणीला पाहू लागला, मात्र विहीर खोल असल्याने त्याला त्याची बहीण दिसली नाही. तेवढ्यात योगिताचा पती देविदास, सासू-सासरे, दीर, जाऊ असे सर्व जण तेथून पळून गेले. मग विलासने घडलेली घटना भाऊ हेमंत यास फोन करून सांगितली. तसेच आई-वडीलांना घेवून ताबडतोब येण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्याचे भाऊ व आई- वडील काही नातेवाईकांना सोबत - घेवून घटनास्थळी आले आणि सर्वांनी मिळून योगिताचा मृतदेह विहीरीतून बाहेर काढला.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने व अप्पर पोलीस अधीक्षक अनिकेत भारती यांच्या मार्गदर्शनाने उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक पुरूषोत्तम शिरसाठ व पोलीस उपनिरीक्षक संजय वाघमारे हे पोलीस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी घटनास्थळ व मृतदेहाचा पंचनामा केला. मृतदेह पोस्टमार्टमसाठी रूग्णालयात पाठवला. पोलिसांनी घटना कशी व का घडली याची माहिती योगिताचा भाऊ विलासकडून घेतली. विलास पवार याने दिलेल्या फिर्यादीनुसार जायखेडा पोलीस ठाण्याला गुन्हा रजि. नं. ३१९/२०२४ ला बी.एन. एस. १०३(२)३ (५) व ८५ कलमाखाली पती देविदास महादू भदाणे, महादू दगा भदाणे, प्रविण महादू भदाणे, पूनम प्रविण भदाणे, सगुणाबाई महादू भदाणे, जिजाबाई महादू भदाणे यांच्याविरोधात करण्यात आला. या गुन्हा दाखल करण गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पुरूषोत्तम शिरसाठ यांनी स्वतःकडे घेतला. नवीन शेती घेण्यासाठी आणखी माहेरून पैसे आणत नाही या कारणावरून योगिता उर्फ अंजनाबाई हिच्याशी वाद घालून सर्वांनी संगनमत करून देविदास याने तिचे दोन्ही हात धरून त्यांच्या स्वतःच्या शेतातील विहीरीत ढकलून देवून तिला ठार मारले. जायखेडा पोलिसांनी गुन्हा दाखल होताच संशयित आरोपींना अटक केली. आपल्या समक्ष बहीणीला विहीरीत ढकलून तिचा खून केल्याच्या घटनेने भाऊ विलास हादरला आहे.

## मंदिरातील बैठकीत रक्ताचा सडा ...

तर दुसऱ्याला बघवित नसते तसेच या समाजातील लोकांचे ही झाले होते. एकाच समाजात दोन गट तट पडल्याने या दोन्ही गटात नेहमी भांडण तंटा हाणामारी ही होत होती. या भांडणात बऱ्याचवेळेला एकमेकांना बघून घेण्याची आणि लाठी काठीची भाषा होत होती. त्यातच सदाशिव बजंत्री यांना देवीच्या उत्सव कमिटीवरून काढले असल्याने त्यांना या गोष्टीचा राग येत होता. तसे पाहिले तर सदाशिव हे समाजातील ज्येष्ट होते. वयाने ते ७०च्या पुढे होते. परंतु हल्ली त्यांना विशाल कैकाडी आणि रविंद्र कैकाडी यांनी देवीच्या यात्रेतील पैशात काही तरी घोळ केल्याचे वाटत होते. त्यामुळे ते सारखे समाजातील बैठकीत त्या दोघावर डुख धरून बोलत होते. त्या दोघावर ते नको ते आरोप करीत होते. यात्रेतील पैशात त्या दोघांनी अपहर केल्याचा आरोप सदाशिव हे चार चौघात आणि समाजाच्या बैठकीत करीत असल्याने त्या दोघांनी ही सदाशिव बजंत्री याचा राग येत होता. त्यांनी सदाशिव यांना बऱ्याच वेळेला तुम्ही समजातील ज्येष्ट आहात जरा तोंड सांभाळून बोला. उगाच काही तरी भलते सलते आरोप करू नका असे बजावले होते. परंतु वयाने ज्येष्ट असल्याने आपले कुणीच काही वाकडे करू शकत नाही असे सदाशिव बजंत्री यांना वाटत होते. त्यामुळे ते समाजातील कोणत्या ही कामात खोडा घालण्याचे काम करीत होते. त्या दोघांनी किती ही चांगले काम केले तरी त्या कामात काही तरी चुक काढून त्यांना ते घेरण्याचा प्रयत्न करीत होते. रविंद्र कैकाडी आणि विशाल कैकाडी हे सदाशिव याच्या आरोपाकडे दुर्लक्ष करीत समाजाचे काम प्रामाणीकपणे करीत असल्याने समाजातील इतर लोकांचा ही त्यांना पाठिंबा होता. समाजातील बाकीचे लोक ही त्यांना साथ देत आहेत हे बघून सदाशिव हे बाकीच्या इतर लोकांना आपल्या बाजुला करण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु हा म्हातारा लई खोडगुणी आहे हे समाजातील इतरांना ही चांगले माहित होते. सदाशिव बजंत्री हे समाजाचे प्रमुख असताना त्यांनी कधी ही देवीच्या यात्रेचा हिशोब समाजाला दाखविला नाही, शिल्लक रक्कम ही त्यांनी कधी दाखविली नाही. आणि उलट आता उगाच नको त्या कामात खो घालून अडथळा निर्माण करीत आहेत हे समाजातील लोकांना कळून चुकले होते. त्यामुळे त्याच्या बाजूने समाजातील कोण सहसा बोलत नव्हते. गेल्या दोन तीन महिन्यापूर्वी श्रावण महिन्याच्या अगोदर देवीची यात्रा भरवली होती. त्या यात्रेत मोठया प्रमाणात खर्च ही करण्यात आला होता. या यात्रेच्या हिशोबाची मिटिंग शनिवार दि.१९ ऑक्टोंबर २०२४ रोजी देवीच्या देवळात बोलाविली होती. समाजातील काही मोजकीच लोक या बैठकीला उपस्थीत होते. रविंद्र कैकाडी आणि विशाल कैकाडी हे दोघे अध्यक्ष उपाध्यक्ष असल्याने त्यांनी बैठकीत यात्रेचा सगळा संपुर्ण हिशोब मांडला.यावेळी तेथे सदाशिव बजंत्री हे ही हजर होते. त्या दोघांनी शिल्लक रक्कम दाखविली होती. ही शिल्लक रक्कम समाजाच्या बँक खातेत शिल्लक ठेवून पुढील काळात त्याचा काही तरी समाजपयोगी काम करण्याचा मानस त्या दोघांनी बैठकीत बोलून दाखविला. त्या दोघांनी शिल्लक रक्कम दाखविली असल्याने बैठकीतील लोकांनी त्याचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी बैठकीत हजर असलेले सदाशिव बजंत्री यांनी शिल्लक रक्कम ही समाजातील सभासदांना परत करावे अशी मागणी केली. त्याला समाजातील इतर लोकांनी विरोध केला. तरी ही सदाशिव यांनी आपले म्हणणे उचलून धरत शिल्लक रक्कम ही परत करावे अशी जोरदार मागणी त्यांनी विशाल कैकाडी आणि रविंद्र कैकाडी याच्याकडे केली. या कारणातून बैठकीत वादाला सुरूवात झाली. प्रकरण हातघाईवर आले. त्यावेळी रविंद्र आणि विशाल यांनी सदाशिव यांना गप्प बसविण्याचा प्रयत्न केला परंतु ते काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. रागाच्या भरात आपल्या वयाचा जरा ही विचार न करता सदावि यांनी त्या दोघांना शिवीगाळ केली. याचा राग त्यांना ही आल्याने त्या दोघांनी सदाशिव यांना मारहाण करीत शिव्या दयायला सुरूवात केली. सदाशिव याच्या अंगावर ते दोघे जात असताना तेथे सदाशिव यांचा नातु संदीप हा आला. त्याने त्या दोघांना आपल्या अजोबांना का शिवीगाळ करीत मारहाण करीत आहे याचा जाब विचारला. त्यावेळी विशाल याने संदीप याला तुझ्या आजोबाला घेऊन जा. नाही तरी त्याचे परिणाम वाईट होतील असे सांगितले.त्याने असे बोलल्यावर संदीपला ही त्याचा राग आला.हे प्रकरण आता मुद्द्यावरून गुद्दावर आले होते. बैठकीत हाणामारी सुरू झाल्यावर मध्ये पडलेल्या संदीप याच्या अंगावर विशाल आणि रविंद्र हे गेले. त्यांनी त्याला खाली पाडून लाथा बुक्क्यांनी मारायला सुरूवात केली. संदीप हा आरडा ओरडा करीत असताना रविंद्र कैकाडी यांने संदीप याच्या डोक्यात बाजुलाच पडलेला दगड जोरात घातला. संदीप याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. त्याच्या डोक्याला मोठी जखम होऊन भोक पडले. मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. हे बघून आजोबा यांनी आराडा ओरडा करीत रविंद्र आणि विशाल यांनी नातू संदीप याला मारून टाकल्याची बोंब ठोकली. समाजाच्या बैठकीत झालेल्या वादात विनाकारण संदीप याचा मृत्यू झाल्याची माहिती मिळताच सदाशिव बजंत्री याच्या घरचे लोक आरडा ओरडा करीत हातात काठया घेऊन तेथे आले. तोपर्यंत तेथून रविंद्र आणि विशाल कैकाडी हे दोघे जण पसार झाले. कुणी तरी या घटनेची माहिती जत पोलीसांना कळवली. जत पोलीसांनी घटस्थळी धाव घेऊन या घटनेची पाहणी केली. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल साळुंखे, पो.निरी. सुरज बिजली यांनी भेट देवून या घटनेची माहिती घेतली. घटनास्थळावरील गर्दी हटवून पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी जत येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेनंतर संशयीत रविंद्र कैकाडी आणि विशाल कैकाडी हे दोघेजण कर्नाटकात पळून गेले होते. त्या दोघांच्या मोबाईल कॉलचे लोकेशन पोलीसांना मिळाल्यावर त्यांना विजयपुर जिल्हयातून ताब्यात घेण्यात आले. त्यांना जत पोलीस ठाण्यात आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो कसा काय केला याची माहिती त्यांनी पोलीसांना दिली. आम्हाला संदीप याला मारायचे नव्हते. परंतु रागाच्या भरात झालेल्या वादावादीत आमच्या हातून त्याचा खून झाल्याचे त्या दोघांनी कबुल केले. या घटनेची लेखी फिर्याद मयत संदीप बजंत्री याचे आजोबा सदाशिव मारूती बजंत्री (वय ७३) रा.उमराणी यांनी जत पोलीसात दिल्याने त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जत पोलीसांनी संदीप गणपती बजंत्री (वय २७) याच्या खून प्रकरणी रविंद्र उर्फ कुमार सिद्राया कैकाडी (वय ३८) आणि विशाल उर्फ विश्वनाथ सिद्राया कैकाडी (वय ४०) रा.दोघे ही उमराणी याच्या विरोधात भा.दं.वी.कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करून जत पोलीसांनी त्यांना जत येथील प्रथम वर्ग न्यायालया समोर उभे केले असता मा.न्यायालयाने त्या दोघांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.पोलीस कोठडी दरम्यान त्या दोघाकडून गुन्हयात वापरलेला दगड आणि त्याच्या अंगावरील रक्ताने माखलेले कपडे जप्त केले. या घटनेचा पुढील तपास जत पोलीस स्टेशनचे पो.निरी.सुरज बिजली याच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नी. जाधव हे करीत आहेत.राग आणि भीक माग अशीच अवस्था ही कोणत्याही वादात होत असते.रागाच्या भरात संतप्त व्यक्ती कडून खूनासारखी अघटित अशी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

पान ८ वरून....

## सोनसाखळी चोरट्यांना २४ तासात ...

सीसीटीव्हीच्या आधारे या गुन्ह्याची उकल अवघ्या २४ तासात केली व सर्व मुद्देमाल हस्तगत केला. या गुन्ह्याचा पुढील तपास सुशीलकुमार शिंदे पोलीस निरीक्षक पुणे हे करीत आहेत. या कामगिरीत हेमंत बजबळे पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ सहाय्यक पोलीस आयुक्त बजरंग देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार व गुन्हे प्रगटीकरण पथकाचे सपोनी ज्ञानेश्वर फडतडे, उपनिरीक्षक अविनाश हाटखिळे, पोलीस हवालदार सचिन लोखंडे, संदीप जाधव, हर्षद चव्हाण, नितीन पाटील, विशाल लोहार, इंद्रनील पाटील, संदिप शेरमाळे, मोहसिन दिवान, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार, उत्कर्ष सोनवणे तसेच पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ कार्यलयाचे पोहवा. नामदेव ढोणे, पोअं. सोहेल शेख यांनी यशस्वीरित्या कामगिरी पार पाडली.

## तेलंग यांनी शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्राचे ...

कोल्हापूर विभागीय शिक्षण मंडळाचा अतिरिक्त पदभार त्यांच्याकडे देण्यात आला होता. आता त्यांची शिक्षण सहसंचालक म्हणून पदोन्नती झाली असून ही त्यांच्या कार्याची पावती आहे. त्यांनी अशी प्रगती करावी, अशा शुभेच्छाही प्राचार्य केंद्रे यांनी दिल्या.

## प्रदूषित पाण्यामुळे मुरबे सातपाटी ...

प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्याने घटनास्थळी येऊन मृत मासे व खाडीतील पाण्याचे नमुने गोळा केले असून ते तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. दरम्यान वेगवेगळ्या आकाराचे व इतर प्रजातींचे मासे देखील मृत पावले असून प्रदूषित पाणी हे त्यामागील प्रमुख कारण असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. तारापूर औद्योगिक वसाहती मध्ये निर्मित होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून हे सांडपाणी खोल समुद्रात सात किलोमीटर अंतरावर सोडण्याची प्रक्रिया काही दिवसांपासून राबवण्यात येत आहे. तरीदेखील तारापूर औद्योगिक वसाहतीमध्ये वेगवेगळ्या चेंबर मधून ओव्हरफ्लो होणारे पाणी नाल्यांच्या मार्गे खाडीत पोहचत असून लांबलेल्या पावसाच्या पाण्यासोबत प्रदूषित व रासायनिक घटक असणारे सांडपाणी खाडीमध्ये मिसळले असल्याची शक्यता आहे. तारापूर औद्योगिक वसाहतीमध्ये निर्मित होणाऱ्या सांडपाण्यांपैकी सहजगत प्रक्रिया करू न शकणारे सांडपाणी टँकर मधून गोळा करून ते पाणी विशेष सांडपाणी प्रक्रिया केंद्रात पाठवण्यात येते. मात्र असे अति प्रदूषित असणारे सांडपाणी गोळा करून त्याची वाहतूक करणारे टँकर व्यवसायिक राजकीय पार्श्वभूमीची असून काही टँकर चालक असे अति प्रदूषित पाणी जवळच्या नदी नाल्यामध्ये सोडत असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. असा एखादा प्रकार काल रात्री किंवा आज पहाटे घडल्याने खाडी मधील मासे मेल्याची शक्यता देखील वर्तवण्यात येत आहे. या खाडीच्या जवळपास एक कोलंबी प्रकल्पापासून त्या ठिकाणी असणाऱ्या पॉन्ड ची साफसफाई करताना पेस्टिसाइड युक्त पाणी खाडीत सोडल्याने ही घटना घडण्याची शक्यता देखील वर्तवण्यात येते आहे. मुरबे सातपाटी खाडीमध्ये मोठ्या प्रमाणात मासे मेल्याची घटना आज बुधवारी सकाळी निदर्शनास आली. मी व माझ्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाण्याची व मृत माशांचे नमुने गोळा करून ते तपासणीसाठी पाठवले आहेत, असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तारापूरचे उपप्रादेशिक अधिकारी राजू वसावे यांनी सांगितले. तर मुरबे व सातपाटी खाडीमध्ये हजारोच्या संख्येने मासे मेल्याची घटना आज सकाळी उघडकीस आली असून त्यामध्ये बोय प्रजातीचे माशांची संख्या अधिक आहे. यासंदर्भात प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयात तक्रार नोंदवण्यात आली आहे, असे मुरबेचे सरपंच मोनालिसा तरे यांनी सांगितले.

28 OCTOBER TO 03 NOVEMBER 2024 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 10/26/2024 10:29 PM Page 1



# सोनोग्राफी बंद असल्याने गरोदर मातांची गैरसोय




**वाडा/वार्ताहर**

वाडा ग्रामीण रुग्णालयातील सोनोग्राफी विभाग मागील दीड महिन्या पासून बंद असल्याने गरोदर मातांना दर आठवड्याची तपासण्या न करताच परत जावे लागत आहे. प्रत्येक मंगळावरी ३० ते ४० गरोदर माता सोनोग्राफी साठी वाडा ग्रामीण रुग्णालयात येतात मात्र सोनोग्राफी विभाग बंद असल्याने त्यांना घरी परत जावे लागते अन्यथा खाजगी रुग्णालयात पदरमोद करावी लागते. तर मागील जवळपास एक महिन्या पासून वाडा ग्रामीण रुग्णालयात खोकल्याचे औषध उपलब्ध नसल्याने रुग्णांना बाहेरून महागडे औषध विकत घेण्याची वेळ आली आहे. अधिक माहिती घेतली असता जिल्ह्यावरून ग्रामीण रुग्णालया नुसार औषध पुरवठा होतो मात्र येथे प्रत्यक्षात उपजिल्हा रूग्णालया प्रमाणे रुग्ण येत असल्याने तो औषध पुरवठा लवकर संपतो. वाडा ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाची मंजुरी मिळाली आहे मात्र जागे अभावी ते काम थांबले आहे. वाडा रुग्णालय मध्यवर्ती ठिकाणी असल्याने या रुग्णालयात रुग्ण संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. आणि अपूर्ण कर्मचारी असल्याने रुग्ण सेवा ढसाळत आहे. सफाई कर्मचारी नसल्याने सर्वत्र घाण व दुर्गंधी पसरलेली दिसून येत आहे. सोनोग्राफी विभाग बंद असल्याने गरोदर मातांची गैरसोय होत आहे. गरोदर माता भगिनी दूरदूर वरून तपासणी साठी येतात मात्र त्यांना परत फिरावे लागते ही गैरसोय टाळण्यासाठी लवकरच सोनोग्राफी विभाग चालू करावा अशी मागणी रुग्णमित्र संघटनेचे भीमराव बागुल यांनी केली आहे. सिनोग्राफी विभागचे तज्ञ बदली झाल्याने ते निघून गेले आहेत.त्यांच्या जागी दुसऱ्या तज्ञाची मागणी आज जिल्हाआरोग्य अधिकाऱ्यांकडे करणार असल्याची माहिती वैद्यकीय अधिक्षक डॉ. यादव शेखरे यांनी दिली.

# परीक्षा केंद्रांवरील गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही-जिल्हाधिकारी

**लातूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत आयोजित महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटेट) १० नोव्हेंबर २०२४ रोजी लातूर येथील ३१ परीक्षा केंद्रांवर घेतली जाणार आहे. या परीक्षेमध्ये कोणताही गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही. त्यामुळे परीक्षा केंद्रांवर नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांनी आपली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या. महाटेट परीक्षा आयोजनाच्या अनुषंगाने परीक्षेसाठी नियुक्त क्षेत्रीय अधिकारी, केंद्र प्रमुख यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्या बैठकीत जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी, प्राथमिक शिक्षण अधिकारी वंदना फुटाणे, शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, डायटच्या प्राचार्य भागीरथी गिरी यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. परीक्षा केंद्रांमध्ये प्रवेश करणाऱ्या प्रत्येक परीक्षार्थीची व्यवस्थित तपासणी करूनच त्यांना परीक्षा केंद्रात प्रवेश द्यावा. प्रतिबंधित केलेली कोणतीही वस्तू त्यांच्यासोबत परीक्षा केंद्रामध्ये घेवू जावू नये, यासाठी प्रवेशद्वारावरील अधिकारी, कर्मचारी यांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. परीक्षेमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार घडू नये, यासाठी प्रशासनाची करडी नजर राहणार असून असा प्रकार आढळून आल्यास कोणाचीही गय केली जाणार नाही. त्यामुळे सर्वांनी आपल्यावर सोपविलेल्या जबाबदारीबद्दल योग्य माहिती घेवून ती जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या. महाटेट परीक्षेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण लवकरच आयोजित केले जाणार आहे. यावेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे सर्वांनी काटेकोरपणे पालन करावे. परीक्षा केंद्रावर प्रवेश करताना कोणकोणती ओळखपत्रे ग्राह्य धरण्यात येणार याबाबतची सुस्पष्टता करून घ्यावी, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी सांगितले. निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांनी परीक्षा केंद्रावरील तपासणी, सुरक्षा आदीबाबत मार्गदर्शन केले. प्रारंभी शिक्षणाधिकारी श्रीमती वंदना फुटाणे यांनी परीक्षेच्या आयोजनाबाबत माहिती दिली. सकाळी १०.३० ते दुपारी १ या कालावधीत पेपर क्रमांक १ चे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी ८ हजार १५६ परीक्षार्थी असून २३ केंद्रांवर ही परीक्षा होईल. पेपर क्रमांक २ चे आयोजन दुपारी २.३० ते सायंकाळी ५ या कालावधीत करण्यात आले असून ३१ केंद्रांवर होणाऱ्या या परीक्षेला ९ हजार ९९३ परीक्षार्थी उपस्थित राहतील. परीक्षा केंद्रावर प्रवेशासाठी प्रवेशपत्राशिवाय मतदान ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड, आधारकार्ड, वाहनचालक परवाना, पासपोर्ट, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, शाळा-महाविद्यालयाचे अद्ययावत ओळखपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहे, असे शिक्षणाधिकारी श्रीमती फुटाणे यांनी सांगितले.

## नालासोपाऱ्यात गोदामाला भीषण आग

**नालासोपारा/प्रतिनिधी**

नालासोपारा पूर्वेच्या आचोळे परिसरात निवासी इमारतीत एका गोदामाला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. ही घटना बुधवारी रात्री नऊच्या सुमारास घडली असून पालिकेच्या अग्निशमन दलाकडून आगीवर नियंत्रण मिळविण्याचे काम सुरू आहे. नालासोपारा पूर्वेच्या आचोळे साडी कंपाऊंड परिसरात एक रहिवासी इमारत आहे. त्या इमारतीत लग्न मंडप व डेकोरेशन साहित्य ठेवण्याचे गोदाम आहे. या गोदामात बुधवारी रात्री अचानकपणे भीषण आग लागली. आगीमुळे इमारत व आजूबाजूच्या परीसरात खळबळ उडाली आहे. आगीचा भडका मोठ्या प्रमाणात असल्याने नागरिक भयभीत झाले होते. या आगीची माहिती वसई विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाला मिळतात घटनास्थळी पोहचून आगीवर नियंत्रण मिळविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. याशिवाय स्थानिक पोलीस ही घटनास्थळी पोहचले आहेत. इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना बाहेर काढण्याचे काम सुरू केले आहे. नेमकी आग कोणत्या कारणामुळे लागली याचे कारण अजून समजू शकले नाही.

# रोटरी क्लब ऑफ वाडातर्फे स्तन कर्करोग तपासणी शिबिर



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा येथे रोटरी क्लब ऑफ वाडाच्या वतीने स्तन कर्करोगाच्या प्राथमिक तपासणीसाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात १०७ हून अधिक महिलांनी सहभाग घेतला, ज्यामध्ये स्तन कर्करोगाचे प्रारंभिक निदान करण्यात आले. लवकर निदान झाल्यास वेळेत उपचार घेऊन रुग्णाचे जीवन वाचवण्याची शक्यता वाढते. तपासणीसाठी अमेरिकेच्या यु.एस.एफ.डी.ए. मान्यताप्राप्त आयब्रेस्टएक्साम या आधुनिक उपकरणाचा वापर करण्यात आला. हे अत्यंत महत्त्वाचे आणि उपयुक्त उपकरण आहे. हे पोर्टेबल उपकरण यु.एस.एफ.डी.ए. आणि सी.डी.एस.सी.ओ. द्वारे मंजूर असून, कोणत्याही प्रकारचे रेडिएशन निर्माण करत नाही आणि स्तन तपासणीची संपूर्ण प्रक्रिया अत्यंत वेदनारहित असते. हे उपकरण स्तनांमध्ये कोणतीही गाठ किंवा कडकपणा शोधण्यास सक्षम आहे. स्तनाचा कर्करोग वेळेवर ओळखला गेला, तर त्यावर प्रभावी उपचार शक्य आहेत; मात्र उशिरा निदान झाल्यास उपचाराची संधी कमी होऊ शकते. या शिबिरात १७ संशयित रुग्ण आढळले असून त्यांना डॉक्टरांमार्फत सखोल तपासणीचा सल्ला देण्यात आला आहे. या महत्त्वपूर्ण आरोग्य प्रकल्पाचे नेतृत्व रोटे डॉ. किरण अमेय पाटील, रोटे. समृद्धी स्वप्नील ठाकरे यांनी केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनात रोटरी क्लब वाडाचे अध्यक्ष रोटे प्रफुल्ल बोकंद, रोटे डॉ. अमेय पाटील, महिला सदस्या रुपाली बोकंद, वैशाली दुर्गुडे, सोनाली उत्तम पाटील, सावनी गव्हाळे, शर्वरी जाधव, तृप्ती गोतारणे, तन्मयी पाटील यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. वाडा शहरातील महिलांनीही या प्रकल्पाला मोलाचा पाठिंबा दिला. रोटरी क्लब वाडाच्या स्तन कर्करोग प्रतिबंध व महिला आरोग्य संवर्धनासाठी केलेले प्रयत्न कौतुकास्पद असून, समाजातील दुर्लक्षित घटकांना आवश्यक आरोग्यसेवा पुरविण्यासाठी या शिबिरांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

# नाशिक विभागीय शालेय तायक्कांडो स्पर्धेत अनुभूती निवासी स्कूलच्या साची पाटील हिला सुवर्ण पदक!

**जळगाव/प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा कार्यालय नाशिक आणि जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने सिन्नर येथे नाशिक विभागस्तरीय शालेय तायक्कांडो स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये अनुभूती निवासी स्कूलची इयत्ता ८ वीची विद्यार्थीनी साची पाटील हिने १४ वर्ष वयोगटा खालील मुलींच्या ३२ ते ३५ वजनगटात भाग घेतला. यामध्ये तीन फेरांमध्ये प्रतिस्पर्धकांनी साची पाटील हिने एकतर्फे मात दिली. जळगाव मनपा ३२-१०, नाशिक मनपा २६-२०, नाशिक ग्रामीण २४-२० ह्यांच्यावर तिने विजय मिळविला. या विजयामुळे तिला सुवर्ण पदकाने सन्मानित करण्यात आले. तिची निवड पुणे बालेवाडी येथे दि.२८ ते ३१ ऑक्टोबर ला होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिला प्रशिक्षक जयेश बाविस्कर (एनआयएस) यांनी मार्गदर्शन केले. तिच्या यशाबद्दल अनुभूती निवासी स्कूलच्या संचालिका सौ. निशा जैन, प्राचार्य देबासिस दास, जळगाव जिल्हा तायक्कांडो असोसिएशन संघटनेचे अध्यक्ष अतुल जैन, उपाध्यक्ष ललीत पाटील, कोषाध्यक्ष सुरेश खैरनार, महासचिव अजित घारगे, सहसचिव रविंद्र धर्माधिकारी, सदस्य महेश घारगे, नरेंद्र महाजन, कृष्णकुमार तायडे, सौरभ चौबे तसेच जैन स्पोर्टस् अॅकॅडमीचे अरविंद देशपांडे यांनी कौतुक केले आहे.



## रस्त्याच्या काँक्रिटीकरणा दरम्यान ट्रक रुतला



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा शहरतील अतिशय महत्वाचा व रहदारीचा असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गाच्या काँक्रिटीकरणाच्या कामाला सुरुवात झाली असून सध्या डांबरी रोड खोदून काढन्याचे काम सुरु आहे. खड्डा खोदून माती बाहेर नेऊन टाकणारा ट्रक जमिनीत रुतून बसल्याने कामाचा वेग मंदावला होता. मातीत रुतलेल्या ट्रक पाहून काही किती पोकळ व नरम जागा आहे याचा अंदाज घेता येतो. या ठिकाणी दगड भराव करून काँक्रिटच्या रस्त्याला मजबूती मिळेल असा भराव टाकणे आवश्यक आहे नाहीतर अवजड वाहणांच्या वजनाने रस्ता नादुरुस्तच होण्याची शक्यता नकारता येत नाही. यासाठी हा रस्ता कंत्रातदार, अभियंता, समाजिक कार्यकर्ते व सुजान नागरीकांच्या देखरेखित होणे आवश्यक आहे. शासकीय अधिकारी, कारचारी व नागरिकांसाठी हा अतिशय महत्वाचा आहेच पण काँक्रीट कारणाचा होणार असल्याने पुन्हा पून्हा दुरुस्ती करणे शक्य होणार नाही.

# विरार येथे टँकर्सच्या पाण्याच्या गळतीमुळे अपघाताचा धोका

**विरार/प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या आधीच वसई - विरारमधील नागरिकांना पाण्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. यामुळे पाणीटंचाईच्या झळा सोसाव्या लागत असल्याने टँकरच्या मागणीत वाढ झाली असून शहरातील रस्त्यांवर टँकर्सची संख्या वाढली आहे. बेदरकारपणे चालणार्या या टँकर्समधून सातत्याने पाण्याची गळती होत असल्याने रस्ते निसरडे होऊन अपघातांची शक्यता वाढली आहे. यामुळे गळक्या टँकर्सवर कारवाई करण्याची मागणी नागरिक करत आहेत. विरार शहरात गेल्या काही अनेक दिवसांपासून नागरिकांना पाणी मुबलक प्रमाणात मिळत नसल्यामुळे हैराण झाले आहेत. यामुळे पाण्याची तहान भागवण्यासाठी टँकर्सवर अवलंबून राहावे लागत आहे. परिणामी रस्त्यावरील टँकर्सची वाहतूक वाढली आहे. टँकर्सवाले वाहतुकीचे सर्वच नियम धाब्यावर बसवून बेदरकारपणे वहाने हाकत आहेत. यात अनेक अपघातांच्या समोर आल्या आहेत. यात टँकर्समधून होणारी पाणी गळती नवी समस्या निर्माण झाली आहे. सातत्याने रस्त्यावरून गळते टँकर्स धावत असल्याने रस्ते ओले होऊन निसरडे बनत आहेत. यात दुचाकीस्वारांना मोठा धोका निर्माण झाला आहे. अनेक दुचाकीचालक या ओल्या आणि निसरड्या रस्त्यामुळे अपघाताचे बळी ठरत आहेत. पोलिसांना अनेक वेळा टँकर्स वाहतुकीच्या वेळा मर्यादित करण्याची मागणी केली आहे. तसेच वाहतूक पोलिसांनी गळत्या टँकरवर कारवाई करण्याचे सुद्धा सांगितले होते. पण अद्यापही या बाबत कोणतीही कारवाई झाल्याचे दिसत नाही. केवळ चिरीमिरीच्या नादात वाहतूक पोलीस टँकर्सवर कारवाई करत नसल्याचे सांगितले जाते. यामुळे शहरातील नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, असे येथील नागरिकांनी सांगितले. या गळक्या टँकर्समुळे विरार पूर्वेकडील साईनाथ, चंदनसार, कोपरी, तसेच नारंगी बायपास रस्त्याची दुरवस्था झाली आहे. त्यातच गुजरात गॅस कंपनीने रस्ते खोदून ठेवले असल्यामुळे रस्ता अरुंद झाला आहे. त्यामुळे रस्त्यावर दरदिवशी अपघाताच्या घटना घडत आहेत. टँकर्समधून पाण्याची गळती होत असल्यास त्यावर कारवाई करणे आवश्यक आहे, असे असतानाही ९९ टक्के टँकर्समधून पाण्याची गळती सुरु असते, त्याची कुठे नोंद केली जात नाही. अशा टँकर्सवर कारवाईसाठी अनेकवेळा मागणी करूनही केवळ कारवाईचे गाजर दिले जाते. वसईत- विरार परिसरात १००० हून अधिक टँकर पाणी सेवा पुरवत असल्याची माहिती वाहतूक शाखेने दिली आहे. तर शेकडो तंदुरस्त नसलेले टँकर्स पाणी भरून मनमानी वाहतूक करतात. यामुळे शहरामध्ये अपघाताचे प्रमाण वाढत आहे.



## खैराची चोरटी वाहतूक करणारा टेम्पो जप्त



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील जंगलातून खैर प्रजाती तस्करांना जणू नष्ट करायची आहे असे सतत होणाऱ्या चोरीच्या घटनांवरून बघायला मिळतं आहे. वन विभाग देखील तस्करांना जशासतसे उत्तर देत असून रविवारी पश्चिम वाडा परिक्षेत्रात खैराचे ओंडके वाहणाऱ्या पीकअप वर कारवाई केली आहे. परिक्षेत्र अधिकारी विकास लेंडे यांना रविवारी पालसई गावाच्या जंगलातील डबकेपाडा भागात काही तस्कर उच्छाद मांडीत असल्याची गुप्त माहिती मिळाली. सापळा रचून तपासणी करतांना वन विभागाची चाहुल लागताच आरोपी पसार झाले मात्र दीड घन मीटर खैराचे सोलीव ओंडके व वाहतूक करणारी पीकअप टेम्पो ताब्यात मिळाली. वन विभागाने या विरोधात गुन्हा दाखल केला असून आरोपींचा शोध सुरु असल्याचे लेंडे यांनी सांगितले. जव्हार उप वनसंरक्षक डॉ. सैपून शेख यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल प्रमोद चव्हाण, वनरक्षक किरण सोनवणे, यशपाल सपकाळ, सुभाष वाघमारे, विजय सूर्यवंशी, श्याम बहीर आदी सहभागी होते. सणासुदीच्या काळात तस्कर सक्रिय होत असून वन विभागाने केलेल्या या कारवाईने निश्चितच तस्करांचे कंबरडे मोडले आहे.

# महिलांनी स्वकर्तृत्वाने स्वावलंबी बनावे -दत्तात्रेय किंद्रे




**वाडा/प्रतिनिधी**

सद्याच्या आधुनिक जगात महिलांना स्वालंबी बनवून स्वतःच्या पायावर उभे राहून त्यांना सक्षम होण्यासाठी विविध कोर्सेस आहेत, यापैकी आपल्याला आवडणार कोणताही कोर्स करून त्यांनी स्वावंलबी बनावे असे प्रतिपादान पोलीस निरिक्षक दत्तात्रेय किंद्रे यांनी केले. ते वाड्यातील पठारे हॉल येथे सावित्रीबाई फुले महिला शिक्षण व सशक्तीकरण केंद्र यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. त्यांनी महिला व मुलींनी स्मार्ट फोन वापरावा त्यापासून होणारे नुकसान याची देखील जाणीव ठेवावी, किंद्रे यांनी महिला सुरक्षेवर महत्वपूर्ण विषयावर मार्गदर्शन केले. वाडा शहरातील उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशन अंतर्गय सावित्रीमाई फुले महिला शिक्षण आणि सशक्तिकरण केंद्र येथे प्राथमिक शिवणकाम अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या ९० हून अधिक प्रशिक्षणार्थीना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाप्रसंगी वक्त्यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणातून प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचे प्रबोधन करत त्यांना प्रोत्साहीत केले. उत्कर्ष फाउंडेशांच्या कार्यकारी अधिकारी सुप्रिया, एडके अधिवक्ता रोहिणी साळवे, वाडा युनिटच्या प्रणाली (स्मिता) पाटील आणि ए. एल. चंदावरकर कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक शशिकांत भालेकर यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वाडा युनिटच्या प्रमुख प्रणाली (स्मिता) पाटील व इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालयात बास्केटबॉल स्पर्धा संपन्न



**जळगाव/प्रतिनिधी**

जळगाव विभाग अंतर महाविद्यालयीन बास्केटबॉल पुरुष महिला स्पर्धेचे आयोजन डॉ.अण्णासाहेब जी डी बेंडाळे महाविद्यालयात, करण्यात आले होते. स्पर्धेत पुरुष गटात ०५ संघ तर महिला गटात ०४. संघांनी सहभाग नोंदविला स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ.गौरी राणे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा संचालिका डॉ.अनिता कोल्हे यांनी केले. सदर प्रसंगी निवड समिती सदस्य डॉ.पी.आर.चौधरी निवड समिती सदस्य प्रा.अमर हटकर अमर हटकर, जळगाव विभागाचे सचिव डॉ.आनंद उपाध्ये, तसेच डॉ.नीलिमा पाटील, प्रा.हिमाली बोरोले, प्रा.सागर सोनवणे, प्रा.जितेंद्र पाटील, प्रा.चव्हाण यांची उपस्थिती होती.

स्पर्धेचा निकाल महिला गट - प्रथम जी.एच. रायसोनी मॅनेजमेंट इंजीनियरिंग महाविद्यालय जळगाव, द्वितीय - डॉ.अण्णासाहेब जी.डीबेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव. तृतीय -शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव. पुरुष गट - प्रथम -शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव.

द्वितीय - जी.एच.रायसोनी मॅनेजमेंट इंजिनिअरिंग महाविद्यालय, जळगाव.

तृतीय - एम.जे. कॉलेज, जळगाव. स्पर्धेसाठी संघ व्यवस्थापक म्हणून डॉ.नीलिमा पाटील, प्रा.हिमाली बोरोले, प्रा.सागर सोनवणे, प्रा.जितेंद्र पाटील, प्रा.चव्हाण यांची उपस्थिती होती.

पंच म्हणून वाल्मीक पाटील, कृष्ण हटकर, कु मनीषा हटकर, तीलक रील. कु प्रतीक्षा सोनवणे, हर्षल भोसले, तुषार बेंडवाल, मयूर सोनवणे, पंच म्हणून उत्कृष्ट कार्य केले. स्पर्धा यशस्वीतेसाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ गौरी राणे यांचे मार्गदर्शना खाली कार्य केले.

## चन्नबसवेश्वर फार्मसीचे यश

लातूर : विद्यापीठ स्तरावरील अविष्कार संशोधन महोत्सवात लातूरच्या चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी नेत्रदीपक यश मिळवले आहे. चन्नबसवेश्वर फार्मसीचे प्रा. महेश मानके यांनी औषध आणि फार्मसी (स्तर पीपीजी)मध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले आहे. तर प्रा. कु. जयश्री स्वामी यांनी शुद्ध विज्ञान (स्तर : पीपीजी)मध्ये प्रथम पारितोषिक पटकावले आहे. तसेच प्रसाद बगळे यांनीही कृषी आणि पशुसंवर्धन ( स्तर :पी जी) मध्ये प्रथम पारितोषिक मिळवले आहे. प्रा. मानके, बगळे यांना डॉ. ओ.जी. भुसनुरे यांचे तर प्रा. स्वामी यांना डॉ. एस.एन. नागोबा यांचे मार्गदर्शन लाभले.

28 OCTOBER TO 03 NOVEMBER 2024 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 10/26/2024 10:29 PM Page 1



### वसईतील खेळाडूंचा कंबोडिया येथील आंतरराष्ट्रीय स्पर्धेत बोलबाला!

# २४ देशांचा सहभाग; भारताला ६ सुवर्ण, १२ रौप्य आणि ९ कांस्य पदकांची कमाई

**वसई/प्रतिनिधी**

कंबोडिय़ा येथे नुकत्याच पार पडलेल्या एशियन चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये पालघर डिस्ट्रिक्टच्या ३ खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत ३ पदके मिळवली. ह्या स्पर्धेमध्ये २४ देशांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये भारत ५व्या स्थानावर होता. भारताला ६ सुवर्ण, १२ रौप्य आणि ९ कांस्य अशी एकूण २७ पदकांची कमाई झाली. यासाठी पालघर डिस्ट्रिक्टचेही योगदान महत्त्वाचे आहे. ही स्पर्धा दि. ६ ते १३ ऑक्टोबर यादरम्यान आयोजित केली होती. पालघर डिस्ट्रिक्ट किकबॉक्सिंग असोसिएशनचे हे सर्व खेळाडू आहेत. वर्ल्ड रेफ्री म्हणून प्रसिद्ध असलेले मुख्य प्रशिक्षक सेन्सई सूर्यप्रकाश मुंडापट आणि प्रमोद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या खेळाडूंना प्रशिक्षणही देण्यात आले आहे. कंबोडिय़ा येथे झालेल्या ह्या स्पर्धेत सायली कान्हात हिने १ सुवर्ण व १ रौप्य तर अमन पवार याने १ रौप्य पदक मिळविले. सिद्धांत मुंडापट याने सहभाग नोंदवत उल्लेखनीय कामगिरी केली. यशस्वी



खेळाडूंनी त्यांचे प्रशिक्षक संतोष अग्रवाल, वाको इंडिया आणि वाको महाराष्ट्रचे अध्यक्ष नीलेश शेलार यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. तसेच राष्ट्रीय प्रशिक्षक नीलेश शेलार आणि सिद्धार्थ भालेगरे यांचे संपूर्ण स्पर्धेत मिळालेल्या सततच्या पाठिंब्यासाठी विशेष आभार व्यक्त केले आहेत. या यशाबद्दल वसई-विरारचे मुख्य संरक्षक आफीफ शेख तसेच कला-क्रीडा समितीचे प्रमुख प्रकाश वनमाळी यांनी आनंद व्यक्त करून मुलांचे कौतुक केले आहे. वसई-विरार महापालिका आणि आ. हितेंद्र ठाकुर यांनीही या खेळाडूंसाठी वेळोवेळी मदतीचा हात दिला आहे. या खेळाडूंना प्रशिक्षणासाठी मोलाचे योगदान व कला-क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्याची प्रेरणा देणारे सहजीवन हॉलचे प्रमुख ओनिल आल्मेडा, लोकसेवा मंडळाचे प्रमुख गॉडफ्री सर आणि क्षेत्रपालेश्वर मंदिराचे प्रमुख सुहास जोशी यांचेही विशेष आभार मानले. पालघर डिस्ट्रिक्ट किकबॉक्सिंग असोसिएशनच्या खेळाडूंनी मिळवलेले हे यश त्यांच्या परिश्रमाचे आणि त्यांच्या प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाचे फलित आहे. भविष्यातही हीच कामगिरी कायम राहील अशी सर्वांनी अपेक्षा व्यक्त केली आहे.

### विरार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रगटीकरण शाखेची धडाकेबाज कारवाई

# सोनसाखळी चोरट्यांना २४ तासात ठोकल्या बेड्या



**विरार/प्रतिनिधी**

विरार पूर्वेकडील मनवेलपाडा रोडवर चालत जाणाऱ्या महिलेला दोन अनोळखी इसमांनी धक्काबुक्की करून शिवीगाळ केली व तिच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून पळून गेल्याची घटना विरार पोलीस स्टेशन हद्दीत घडली. घडल्या प्रकाराची तक्रार महिलेने विरार पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी आहे की विरार पूर्वेकडील पनवेलपाडा रोडवर सुनंदा संदीप पवार ही महिला अत्तर वाईट बिल्डिंगसमोर चालत जात असताना एका मोटरसायकल वरून दोन अनोळखी इसम त्या महिलेजवळ येऊन तिला शिवीगाळ व धक्काबुक्की केली व खाली पाडून तिच्या गळ्यातील एक तोळ्याच्या वजनाचे मंगळसूत्र घेऊन पसार झाले. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गुन्हे प्रगटीकरण शाखेचे अधिकाऱ्यांना तात्काळ आदेश दिले. गुन्हे प्रगटीकरण शाखेच्या पोलिसांनी त्या परिसरातील जवळपास ७५ ते ८५ सीसीटीव्ही फुटेज तपासून दोन अनोळखी इसमांना पळून जात असताना दिसले. या आधारे गुप्त बातमीदाराच्या आधारे परिसरात तपास करून सराईत तडीपार गुन्हेगार शंकर हाल्या दिवा (वय ३७) व त्याचा साथीदार राजे संतोष वाघ (वय २१) या दोघांना कातकरी पाडा देवकी निवास बंगल्याजवळ ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता. त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलीस रेकॉर्ड प्रमाणे विरार पोलीस ठाणे, आचोळा पोलीस ठाणे, नालासोपारा पोलीस ठाणे, माणिकपूर पोलीस ठाणे या आधीही जबरी चोरी केल्या असल्याचे चौकशीत समोर आले आहे. पोलिसांनी मोठ्या चतुराईने ...पान ६ वर

### विरार येथे ‘हेप्सीचे वादळ’ पुस्तकाचे प्रकाशन



**विरार/प्रतिनिधी**

विरार येथे संजय राऊत यांच्या हेप्सीचे वादळ या पुस्तकाचा प्रकाशनाचा कार्यक्रम पार पडला. हया कार्यक्रमाला वसई विरार महानगरपालिकेच्या माजी महापौर प्रविणाताई ठाकूर, फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशनचे अध्यक्ष पुरुषोत्तम पवार तसेच बहुजन विकास आघाडीचे संघटक सचिव अजीव पाटील, आणि स्थायी समितीचे माजी अध्यक्ष प्रशांत राऊत उपस्थित होते. हेप्सीचे वादळ या पुस्तकात लेखकाने लिव्हर ट्रान्सप्लांट बाबतीतले स्वानुभव लिहिलेले असून, हे पुस्तक यकृत प्रत्यारोपण करण्यास सांगितलेल्या रुग्णांसाठी खूप उपयुक्त माहिती देणार आहे. या कार्यक्रमात क्रांती राऊत-चुरी हिने आपल्या पित्याला यकृतदाना बद्दल माजी महापौर प्रवीणताई ठाकूर यांनी आपल्या भाषणातून तिचा गौरव केला. फेडरेशनचे अध्यक्ष पुरुषोत्तम पवार यांनी अवयव त्यांना संदर्भात अतिशय उपयुक्त माहिती आपल्या भाषणातून दिली. बविआचे संघटक सचिव अजीव पाटील यांनी आपल्या भाषणातून, पुस्तकाचे विवेचन करून कोरोना काळातील आठवणी जागवल्या. संजय राऊत लिखित हेप्सीचे वादळ हे पुस्तक न्यू मुद्रा बुक डेपो विष्णू प्रतिभा हॉलमागे, विरार, तसेच मॅजेस्टिक बुक डेपो, आयडियल बुक डेपो आणि मेझॉन वर उपलब्ध होईल.

# प्रदूषित पाण्यामुळे मुरबे सातपाटी खाडीत हजारो मासे मृत; मच्छीमारांचा थेट आरोप



**पालघर/प्रतिनिधी**

पालघर तालुक्यातील सातपाटी व मुरबे दरम्यान असणाऱ्या खाडीमध्ये आज सकाळी हजारोंच्या संख्येने मासेमृत पडल्याची घटना समोर आली आहे. प्रदूषित पाण्यामुळे मासे मृत पावल्याची शक्यता वर्तविण्यात येत असून मच्छीमार समुदायाने या घटनेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आज सकाळी साडेनऊ दहाच्या सुमारास मुरबे खाडी मधील पाण्यावर बोई प्रजातीचे मासे मृत होऊन पाण्यावर तरंगत असल्याचे निदर्शनास आले. काही वेळानंतर पाण्यावर तरंगणाऱ्या मृत माशांची संख्या वाढून ती हजारोच्या संख्येत गेली. तरंगणारे मासे पाहण्यासाठी गावकरी समुद्रकिनारी पोहोचले व त्यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयात यासंदर्भात तक्रार नोंदवली. ...पान ६ वर

# तेलंग यांनी शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्राचे नेतृत्व करावे -प्रा.केंद्रे



**लातूर/प्रतिनिधी**

सुधाकर तेलंग यांनी मागील २५ वर्षांपासून शिक्षणाधिकारी पदापासून विभागीय सहसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण सचिव आदी पदांवर काम केले आहे. त्यांची शिक्षण सहसंचालक म्हणून पदोन्नती झाली आहे. त्यांनी शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्राचे नेतृत्त्व करावे, असे प्रतिपादन संस्थाचालक संघटनेचे कोषाध्यक्ष प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी केले आहे. लातूर विभागीय शिक्षण मंडळाचे सचिव सुधाकर तेलंग यांची शिक्षण सहसंचालकपदी पदोन्नती झाली आहे. त्यानिमित्त त्यांचा व त्यांच्या सुविद्य पत्नी उषा तेलंग यांचा शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांच्यावतीने सत्कार करण्यात आला. त्यावेळी प्राचार्य केंद्रे बोलत होते. यावेळी ‘आरसीसी’चे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर, ‘जुक्टा’ संघटनेचे मार्गदर्शक प्रा. मुकुंद बोकारे, वसंतराव पाटील, ‘जुक्टा’ संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष प्रा. संभाजी वडजे, प्रा. मारुती सूर्यवंशी, प्रा. सिध्देश्वर शेटे, प्रा. टाले, पेंढारकर, प्रकाश भाजगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्राचार्य केंद्रे म्हणाले, तेलंग यांची एक कर्तव्यदक्ष अधिकारी व कवी म्हणूनही लातूर विभागातच नाही तर महाराष्ट्रात ओळख आहे. कार्यकुशलतेमुळे लातूर, छत्रपती संभाजीनगर आणि ...पान ६ वर

# चैतन्य प्रेरीत संस्था व प्रेरणा ग्रामीण संघ यांच्या वतीने शैक्षणिक जागृती

**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील आदिवासी ग्रामीण भागात कार्यरत असलेली गुंज आश्रम शाळा येथे बुधवारी (दि.२३) रोजी चैतन्य संस्था प्रेरित, प्रेरणा ग्रामीण महिला संघ कुडूस यांच्या विद्यमानाने शैक्षणिक जनजागृती सखी सावित्री कमेटीच्या समुपदेशक राजश्री तरसे यांनी इ.८वी ते इ.१० वी पर्यत च्या मुलींना शिक्षण का



घेतले पाहिजे यांचे महत्व पटवून देवून, शिक्षण मुलीच्या जीवनात किती महत्वाचे आहे हे सांगितले, जर सावित्रीबाई फुले जन्माला आल्या नसत्या तर महिलाही अशिक्षित राहीली असती चुल आणि मुलं यामध्ये अडकून राहीली असती, तर घटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांना समान आधिकार देवून उपकार केले नसते, आज या देशाच्या पंतप्रधान, राष्ट्रपती या महिला कधीच झाल्या नसत्या. मुलींच्या स्वप्नाची पुर्तता करायची असेल तर स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी शिक्षण घेतलेच पाहिजे, त्या शिवाय पर्याय नाही त्यासाठी त्यांनी स्वतःचे उदाहरण दिले. त्यावेळी आश्रम शाळेचे मुख्याध्यापक. ए.व्ही. पाटील, अधिक्षिका एम.एम.पाटील आणि कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

























